

परप्रांतीयांना मारणे हा मराठी माणसांचा विकास नाही (पान ५ वर)

दैनिक

# दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक



नागपुरात आचारसंहितेचा भंग?:चंद्रशेखर बावनकुळे वादाच्या भोवऱ्यात (पान ८ वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ E-mail : divyawatan@gmail.com गुरुवार दिनांक १५ जानेवारी २०२६ अंक : १६१ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८


## महत्त्वाचे...

### पुण्यात चक्क माजी मंत्र्यांकडूनच पैसे वाटप!



पुणे -महापालिका निवडणुकीच्या आदल्या दिवशी अनेक ठिकाणी पैसे वाटप करण्यात आल्याच्या अनेक घटना उघडकीस आल्या आहेत. आता असाच प्रकार पुण्याच्या वानवडी साळुंके विहार प्रभागात झाल्याचे समोर आले आहे. माजी मंत्र्यांनीच पैसे वाटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या संदर्भात काँग्रेसचे नेते प्रशांत जगताप यांनी याबाबतची माहिती दिली आहे.

प्रशांत जगताप यांनी सांगितले की, आज दुपारपासून भाजपच्या दादागिरीला आणि पैसे वाटण्याच्या प्रकाराला उत आलेला आहे. खूप जोरदार पैसे वाटण्याचा प्रकार सुरू आहे. कुठलाही विकास प्रकल्प नसल्याने पैसे वाटण्याशिवाय पर्याय नाही. भाजपमध्ये गेलेले माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर यांनी आज दुपारपासून पैसे वाटत आहेत, असा दावा जगताप यांनी केला आहे.पुढे बोलताना प्रशांत जगताप म्हणाले, बाळासाहेब शिवरकर यांनी त्यांच्या मुलाच्या प्रचारात पैसे वाटले आहेत. त्यांचे चिरंजीव अभिजीत शिवरकर हे माझ्या विरोधात निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या उमेदवारांसाठी बाळासाहेब शिवरकर हे स्वतः पैसे वाटत आहेत. आमच्या काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पकडले आणि आझाद नगर पोलिस ठाण्यात नेले आहे. त्यांना त्यांच्या गाडीसाह पोलिस ठाण्यात नेण्यात आले आहे. त्यांची आता चौकशी सुरू आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची देखील आम्ही मागणी केली आहे. तसेच राज्य निवडणूक आयोगाने देखील त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी जगताप यांनी केली आहे.

### कोल्हापुरात मतदानाच्या तोंडावर अघोरी प्रकार



कोल्हापूर -राज्यात महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानाची रणधुमाळी शिगेला पोहोचली असतानाच, कोल्हापूर जिल्ह्यातील शिवसेना ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख रविकिरण इंगवले यांच्या विरोधात राधानगरी तालुक्यातील दुर्गमानवाड येथे 'भानामती' सारखा धक्कादायक आणि गंभीर प्रकार घडल्याचे उघडकीस आले आहे. मतदानाच्या अवघ्या एक दिवस आधी हा संतापजनक प्रकार समोर आल्याने संपूर्ण जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली असून, राजकीय तसेच सामाजिक वर्तुळात या घटनेचे तीव्र पडसाद उमटत आहेत. ऐन निवडणुकीच्या धामधुमीत घडलेल्या या प्रकारामुळे कोल्हापूरमधील वातावरण अधिकच तापले आहे.गेल्या तीन-चार वर्षांपासून कोल्हापूर शहरातील स्थानिक नागरी समस्या, सामाजिक प्रश्न आणि विकासाच्या मुद्द्यांवर सातत्याने आंदोलने करणारे रविकिरण इंगवले यांनी महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत महायुतीच्या नेत्यांविरोधात आक्रमक पवित्रा घेतला होता. प्रचारसभांमधून त्यांनी सत्ताधारी नेत्यांवर भ्रष्टाचार, गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि घराणेशाहीचे गंभीर आरोप करत जोरदार हल्ला चढवला.

# राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी 'महासंग्राम'

## मतदानासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज, 'मिनी विधानसभा' निवडणुकीची रणधुमाळी!

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई- राज्यातील 29 महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज (ता. 15) मतदान होत असून त्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. एकूण 2 हजार 869 जागांसाठी ही निवडणूक होत असून एकूण 3 कोटी 48 लाख 79 हजार 337 मतदारांकरिता एकूण 39 हजार 92 मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणूक रिंगणात एकूण 15 हजार 908 इतके उमेदवार आहेत. तसेच पुरेशा पोलिस बंदोबस्ताचीदेखील व्यवस्था करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने 29 महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या कार्यक्रमाची घोषणा दि. 15 डिसेंबर 2025 रोजी केली होती. त्यानुसार बृहन्मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, वसई-विरार, कोल्हापूर, कल्याण-डोंबिवली, ठाणे, उल्हासनगर, नाशिक, पुणे, पिंपरी- चिंचवड, सोलापूर, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, लातूर, परभणी, भिवंडी- निजामपूर, मालेगाव, पनवेल, मीरा- भाईंदर, नांदेड-वाघाळा, सांगली- मीरज, कुपवाड, जळगाव, धुळे, अहिल्यानगर, इचलकरंजी आणि जालना महानगरपालिकेसाठी मतदान होत आहे.मतदान आज (ता. 15) सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत होईल. मतमोजणीस संबंधीत ठिकाणी 16 जानेवारी 2026 रोजी सकाळी 10 वाजता सुरवात होईल. एकूण मतदारांमध्ये 1 कोटी 81 लाख 94 हजार 292 पुरुष, 1 कोटी 66 लाख 80 हजार 449 महिला; तर 4 हजार 596 इतर मतदारांचा समावेश आहे. त्यांच्यासाठीच्या एकूण 39 हजार 92 मतदान केंद्रांपैकी एकूण 3 हजार 196 संवेदनशील मतदान केंद्र घोषित करण्यात आली आहेत.

महानगरपालिका निवडणुकांसाठी पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात 43 हजार 958 कंट्रोल युनिट आणि 87 हजार 916 बॅलेट युनिटची उपलब्धता केली आहे.



बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी 11 हजार 349 कंट्रोल युनिट आणि 22 हजार 698 बॅलेट युनिटची व्यवस्था केली आहे.

बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व 28 महानगरपालिकांच्या निवडणुका बहुसदस्यीय पद्धतीने होत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेत एका प्रभागातून एकच सदस्य निवडून द्यावयाचा असल्याने प्रत्येक मतदाराला केवळ एकच मत द्यावे लागेल. उर्वरित सर्व 28 महानगरपालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे प्रत्येक प्रभागात साधारणतः चार जागा असतील. काही महानगरपालिकांच्या काही प्रभागांत तीन अथवा पाच जागा असू शकतील. त्यानुसार बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व महानगरपालिका निवडणुकांमध्ये प्रत्येक मतदाराने साधारणतः 4 मते देणे अपेक्षित आहे. काही ठिकाणी 3 ते 5 मते देणे अपेक्षित असेल. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे 227 प्रभाग असून यांसह सर्व महानगरपालिका मिळून 893 प्रभाग आहेत. त्यात एकूण 2 हजार 869 जागांचा समावेश आहे. त्यासाठी एकूण 15 हजार 908 उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

महानगरपालिका निवडणुकांसाठी पुरेशा पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात 3 अपर पोलिस अधीक्षक, 63 पोलीस उप अधीक्षक, 56 पोलीस निरीक्षक, 858 सहायक पोलीस निरीक्षक / पोलीस उपनिरीक्षक आणि 11 हजार 938 पोलीस अंमलदारांचा समावेश आहे. त्याचबरोबर एकूण 42 हजार 703 होमगार्ड देखील तैनात करण्यात आले आहेत. मतमोजणी आणि कायदा व सुव्यवस्थेच्या बंदोबस्तासाठी राज्य राखीव पोलीस दलाच्या एकूण 57 कंपन्या तैनात करण्यात आल्या आहेत. महानगरपालिका निवडणुकांसाठीचे मतदान आणि मतमोजणीची तयारी; तसेच 12 जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गच्या 125 पंचायत समितींच्या निवडणुकांची तयारी याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली आज (ता. 14) बैठक घेण्यात आली. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, पोलिस महानिरीक्षक मनोजकुमार शर्मा आणि विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मतदान, मतमोजणी; तसेच कायदा व सुव्यवस्था याबाबत उपस्थित प्रतिनिधींना अवगत करण्यात आले.

## माझा महायुती किंवा मविआला पाठिंबा नाही:मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना सहकार्य करू नका, मनोज जरांगेंचे आवाहन

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई- मुंबईसह राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उद्या मतदान होत असतानाच, मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट करत कोणत्याही राजकीय आघाडीला पाठिंबा दिला नसल्याचे जाहीर केले आहे. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी महाविकास आघाडी किंवा महायुती यांपैकी कोणाचीही बाजू घेतलेली नाही, असे स्पष्ट करत त्यांनी तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, माझ्या नावाने कोणी पाठिंब्याचे पत्रक प्रसिद्ध करत असेल, तर त्यावर समाजाने विश्वास ठेवू नये, असे आवाहन करत त्यांनी मतदानाच्या तोंडावर होणाऱ्या अफवांना पूर्णविराम दिला आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले, माझा मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात होत असलेल्या निवडणुकीत महायुती आणि



महाविकास आघाडी असा कुणालाही पाठिंबा नाही. माझे जूने व्हिडिओ कोणी व्हायरल करत असतील तर ते चूकीचे आहे. माझ्या नावाने कुणी पत्रके प्रसिद्ध करत असतील तर त्यावर कुणीही विश्वास ठेवू नये. जर कुणी स्थानिक पातळीवर पिठींबा दिला असेल तर तो त्यांचा व्यक्तिगत विषय असेल त्याचा आमच्याशी कोणताही संबंध नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

मराठा आरक्षणाला विरोध करणारे ते जर कोणी उभे असतील त्यांना मात्र मराठा समाजाने सहकार्य करू नये, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे. ते लोक मराठा समाजाच्या लेकरांच्या मुळावर उठलेले आहेत, ते लक्षात घ्यावे. मुंबईसह, महाराष्ट्रात कोणाला पाठिंबा दिलेला नाही, हे लक्षात घ्यावे. महायुती किंवा महाविकास आघाडीला पाठिंबा दिलेला नाही. मुंबई असो की महाराष्ट्रातील इतर महापालिका निवडणुकीत कोणाला पाठिंबा दिलेला नाही. चळवळीत असणाऱ्या पोरांवर सर्वांनी लक्ष ठेवले पाहिजे, असेही जरांगे पाटील यांनी म्हटले.

## भाजपकडून दहिसरमध्ये 'मिक्सर' वाटप!

### काँग्रेसने जाब विचारताच पोलिसांनी घेतले ताब्यात

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई- महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानासाठी अवघे काही तास उरले असताना दहिसरच्या शांतीनगर जनकल्याण (वॉर्ड क्र. 3) परिसरात मोठी राजकीय खळबळ उडाली आहे. भाजप कार्यकर्त्यांकडून मतदारांना छुप्या पद्धतीने 'मिक्सर' वाटप केले जात असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसने केला असून, या प्रकरणाचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनाच पोलिसांनी ताब्यात घेतल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शांतीनगर जनकल्याण भागात भाजपच्या कार्यकर्त्यांकडून नागरिकांना प्रलोभन म्हणून मिक्सरचे वाटप केले जात असल्याची माहिती काँग्रेस कार्यकर्त्यांना मिळाली होती. या कथित प्रकाराचा पर्दाफाश करण्यासाठी काँग्रेसचे उमेदवार प्रदीप चौबे, मुंबई युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष अखिलेश यादव आणि मुंबई काँग्रेसचे सरचिटणीस विकास पांडे हे आपल्या समर्थकांसह घटनास्थळी दाखल झाले.

## शरद पवारांना मोठा धक्का!:कट्टर समर्थकाने सोडली साथ, माजी आमदार रमेश कदम यांचा राजीनामा

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

महापालिकेच्या निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार प्रचार केला. मंगळवारी या प्रचाराच्या तोफा थंडावल्या असून उद्या (15 जानेवारी) मतदान पार पडणार आहे. दरम्यान, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेकांना उमेदवारी मिळाली नाही. ज्यांना उमेदवारी मिळाली नाही असे अनेक कार्यकर्ते तसेच नेत्यांनी पक्ष सोडून इतर पक्षात प्रवेश केला आहे. आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला मोठा धक्का बसला आहे. माजी आमदार रमेश कदम यांनी राजीनामा दिला असून हा शरद पवारांना



मोठा हादरा असल्याचे बोलले जात आहे.शरद पवार यांचे कट्टर समर्थक व माजी आमदार रमेश कदम यांनी शरद पवारांची साथ सोडली आहे. रमेश कदम यांनी शरद पवार गटाचा राजीनामा दिला असून हा पक्षासाठी मोठा धक्का मानला जात आहे. रमेश कदम यांचा चिपळूण नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत पराभव झाला होता, त्यानंतर त्यांनी आता राजीनामा दिला आहे. तसेच रमेश कदम नाराज असल्याचे हो बोलले जात होते. पक्षात योग्य स्थान आणि सहकार्य न मिळाल्याने त्यांनी पक्षाच्या प्रदेशाध्यक्षकांकडे आपला राजीनामा दिला आहे.

रमेश कदम हे 1984 पासून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते. अजित पवारांनी बंड केल्यानंतर पक्षातील अनेक मोठे नेते अजित पवारांच्या गटात प्रवेश केला. मात्र रमेश कदम यांनी शरद पवारांची साथ सोडली नव्हती. शरद पवारांचे कट्टर समर्थक अशी रमेश कदम यांची ओळख आहे. परंतु, पक्षातील नाराजीमुळे अखेर कदम यांनी शरद पवारांची साथ सोडण्याचा निर्णय घेतला असल्याचे समजते.दरम्यान, मंगळवारी निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांची घोषणा केली आहे. 5 फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून, 7 फेब्रुवारी रोजजी मतमोजणी होणार आहे.

## लोकशाहीच्या फोटोला हार घालून सगळे उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करा:रोहित पवारांचा भाजपवर संताप

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी ईव्हीएमला जोडण्यात येणाऱ्या पाडू मशीनवर संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणी त्यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेचे समर्थन केले आहे. ठाकरे बंधूंनी उपस्थित केलेला मुद्दा अत्यंत धक्कादायक व लोकशाहीसाठी धोकादायक आहे. भाजपने आता लोकशाहीच्या फोटोला हार घालून या निवडणुकीत आपले सर्वच उमेदवार निवडून आलेत असे जाहीर करावे, असे त्यांनी म्हटले आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज महापालिका निवडणुकीत ईव्हीएम



मशीनला जोडण्यात येणाऱ्या पाडू मशीनवर संशय व्यक्त केला. राज्य निवडणूक आयोगाने कोणत्याही राजकीय पक्षाला विश्वासात न घेता ही मशीन ईव्हीएमला जोडण्याचा निर्णय घेतला. त्यांनी ही मशीन कशी दिसते हे ही कुणाला सांगितले किंवा दाखवले नाही. त्यामुळे हा सर्व प्रकार संशयास्पद आहे, असे ते म्हणालेत. रोहित पवार यांनी त्यांच्या या भूमिकेचे जोरदार समर्थन करत सध्या निवडणुका घेण्याचा केवळ फार्स सुरू असल्याचा आरोप केला आहे.रोहित पवार म्हणाले, कुणालाही काडीचीही कल्पना न देता निवडणूक आयोगाने एक नवीन मशीन आणलं असून ते EVM ला जोडण्यात येणार असल्याचं समजतंय. हे मशीन काय आहे, कशाचं आहे आणि कशासाठी लावलं जातंय याची कुणालाही कोणतीही कल्पना नाही, याबाबत मा. राज ठाकरे साहेब आणि उद्धव ठाकरे साहेब यांनी काढलेला मुद्दा तर खूप धक्कादायक आणि लोकशाहीसाठी धोकादायक आहे. असं असेल तर निवडणुका घेण्याचा हा केवळ फार्स तर नाही ना? असंच करायचं असेल तर भाजपाने लोकशाहीच्या फोटोला हार घालून या निवडणुकीत त्यांचे सगळेच उमेदवार निवडून आले,

## ओळखपत्र हरवलं तरी मतदान शक्य कसं?:मतदार यादी तपासण्यापासून स्लिप डाऊनलोडपर्यंत सगळी माहिती; आयोगाचा दिलासा

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे राज्यात राजकीय वातावरण तापले असून लोकशाहीच्या या उत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. मुंबई वगळता राज्यातील 29 पैकी 28 महानगरपालिकांमध्ये प्रभाग पद्धतीने निवडणुका होत असून या प्रक्रियेत मतदार हा केंद्रस्थानी आहे. प्रचाराच्या रणधुमाळीत उमेदवार आणि पक्ष व्यस्त असताना, प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी नागरिकांचा सहभाग किती असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र आजही अनेक मतदारांकडे मतदार ओळखपत्र नसणे, ते हरवणे किंवा उपलब्ध नसणे, ही मोठी अडचण ठरते. ही बाब लक्षात घेऊन निवडणूक आयोगाने मतदारांसाठी मोठा दिलासा देणारी सवलत जाहीर केली आहे.

निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार मतदानासाठी इलेक्ट्रॉनिक फोटो ओळखपत्र म्हणजेच EPIC कार्ड असणे उपयुक्त असले, तरी ते बंधनकारक नाही. मतदानासाठी सर्वात महत्त्वाची अट म्हणजे अधिकृत मतदार यादीत नाव नोंदलेले असणे. जर एखाद्या नागरिकाचे नाव मतदार यादीत असेल, तर त्याला मतदानाचा हक्क नाकारता येत नाही. त्यामुळे 'कार्ड नाही म्हणजे मतदान नाही' हा समज चुकीचा असून आयोगाने या संदर्भात स्पष्ट नियम आखून दिले आहेत.

ज्या मतदारांकडे मतदार कार्ड नाही, त्यांनी घाबरण्याची आवश्यकता नाही. अशा मतदारांना मतदान केंद्रावर 'वोटर स्लिप' म्हणजेच निवडणूक पावती आणि त्यासोबत अन्य सरकारमान्य फोटो असलेले ओळखपत्र दाखवून मतदान करता येते. निवडणूक स्लिप ही केवळ मतदान केंद्र, भाग क्रमांक आणि अनुक्रमांक सांगणारी पावती असते, त्यामुळे ती एकटी पुरेशी नसते. ओळख पटवण्यासाठी फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र आवश्यक असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

कोणतेही एक ओळखपत्र दाखविल्यास प्रवेश

निवडणूक आयोगाने पर्यायी ओळखपत्रांची स्पष्ट यादी दिली आहे. यामध्ये आधार कार्ड, पॅन कार्ड, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स, मनरेगा जॉब कार्ड, फोटो असलेले पेन्शन कार्ड, केंद्र किंवा राज्य सरकारचे कर्मचारी ओळखपत्र, बँक किंवा पोस्ट ऑफिसने जारी केलेले फोटोसह पासबुक, तसेच कामगार मंत्रालयाने जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड यांचा समावेश आहे. यापैकी कोणतेही एक ओळखपत्र दाखविल्यास मतदाराला मतदान केंद्रात प्रवेश दिला जाऊ शकतो.




निवडणुकीच्या दिवशी गोंधळ टाळण्यासाठी मतदारांनी आधीच आपले नाव मतदार यादीत आहे की नाही, हे तपासणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अनेकदा मागील निवडणुकीत नाव यादीत असते, म्हणून यावेळीही असेल, असा समज केला जातो. मात्र प्रत्यक्षात मतदार याद्या प्रत्येक निवडणुकीपूर्वी अद्ययावत केल्या जातात. स्थलांतर, मृत्यू, नावातील दुरुस्ती, पत्त्यातील बदल किंवा प्रशासकीय चुका यामुळे काही वेळा नाव वगळले जाऊ शकते.

मतदार यादीत नाव तपासण्यासाठी निवडणूक आयोगाने सोपी आणि डिजिटल सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

१ २ ३ ४ ५ ६

# राज्य उत्पादन शुल्क विभागाची गोंडवाना पिंपरी येथे छापा टाकून धडक कारवाई

## बनावट देशी - विदेशी दारुचा कारखाना होता सुरु, १ हजार ९० लिटर देशी दारुचा बनावट ब्लेंड जप्त

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर: राज्य उत्पादन शुल्क नागपूर विभागाचे विभागीय उपायुक्त गणेश पाटील व जिल्हा अधीक्षक सुरज कुमार रामोड यांच्या मार्गदर्शनाखालील विभागीय भरारी पथकाने गोंडवाना पिंपरी, हिंगणा येथील माय टाऊन सोसायटी, सेक्टर-8 येथील बंगलो क्रमांक 133 येथे नुकताच छापा टाकून बनावट देशी-विदेशी दारुच्या कारखान्याला टाळे ठोकले. घटनास्थळावरुन 1 हजार 90 लिटर देशी दारुचा बनावट ब्लेंड, महाराष्ट्रात विक्रीस प्रतिबंधीत असलेल्या गोवा व्हीस्कीच्या 356 बाटल्या, 90 बिएल बनावट देशी दारु, इलेक्ट्रानिक बॉटल सिलींग मशिन बनावट रॉकेट देशी दारु नावाचे कागदी लेबल, जीवंत पत्रीबुचे, रिकाम्या बाटल्या, बनावट रॉयल स्टग विदेशी दारुचे जीवंत प्लॉस्टीक जीवंत बुचे, चारचाकी वाहन असे एकूण 24 लाख 67 हजार 704 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यत आला.

या गुन्हा क्रमांक 19/2026 अन्वये शुभम गोविंद तिवारी वयवर्ष 31 ( फरार मुख्य आरोपी ), गोविंद रामदत्त तिवारी वयवर्ष 59, शैलेंद्र धुर्वे वय वर्ष 24, रघुनाथ उईके वयवर्ष 21, राजकुमार उईके वयवर्ष 25, द्वारका शिवलाल इनवाती वयवर्ष 45 व प्रमोद नथ्थुजी सयाम वयवर्ष 42 या आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई विभागीय भरारी पथकाचे निरीक्षक दशरथ क्षीरसागर, दुय्यम निरीक्षक जगदीश पवार, लांबाडे, निरीक्षक बालाजी चाळणेवार, दुय्यम निरीक्षक वैभव दीवाण, अमित क्षीरसागर, शुभम ढोके यांनी या कारवाईत सहकार्य केले. जवान सर्वश्री राहुल सपकाळ, गजानन राठोड, सुधीर मानकर, किरण वैद्य, सचिन



आडोळे, विनोद डुंबरे यांनी ही कारवाई यशस्वीरित्या पार पाडली. सदरील गुन्ह्याचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक जगदीश पवार विभागीय भरारी पथक, नागपूर हे करीत आहेत. अवैध मद्य निर्मिती, विक्री, वाहतूक या संदर्भात कोणतीही तक्रार असल्यास टोल फ्रि क्रमांक 18002339999 व व्हॉटस्ॲप क्रमांक 8422001133 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाने केले आहे.



# मनपा निवडणुकीच्या आचारसंहिता काळात अवैध धंदे करणाऱ्यावर रेड कारवाई

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपुर - पो. ठाणे धंतोली नागपुर शहर दिनांक १२/०१/२०२६ पोलीस ठाणे धंतोली नागपुर शहर येथे आगामी महानगरपालीका निवडणुकीच्या आचारसंहीता काळात अवैध धंदे करणारे यांचेवर रेड कारवाई करून एम.डी-१.८२ ग्रॅम कि अं ४००० रू, गांजा १२३ ग्रॅम कि अं ४५०० रू, व जुगार ४७८५ रू नगदी, देशी दारू २५ बॉटल कि अं ११६०रू चा मूददेमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच सराईत गुन्हेगार हिस्ट्रीशिटर यांचे वर प्रतिबंतक कारवाई ११ इसमावर कारवाई करण्यात आली व ११ इसमांना हददपार करण्यात आले आहे. पोलीस ठाणे येथील वाहन चोरी चे एकुण ०४ गुन्हे उघडकिस आणुन ०४ वाहन कि अं १००००० रू चा मूददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच पोलीस ठाणे धंतोली येथे दाखल अपराध क्रमांक ५१९ /२०२५ कलम १०९ (१), ११५ (२), ३ (५), बीएनएस मधील आरोपीचा शोध घेवुन आरोपीला अटक करण्यात आली तसेच पोलीस ठाणे धंतोली येथे दाखल ०५/२०२६ कलम १०९ (१), ११५ (२), ३५१ (३) ,३ (५), बीएनएस मधील चार आरोपींचा शोध घेवुन त्यांना अटक करण्यात आली. तसेच मा. वरीष्ठांच्या आदेशाने पोलीस ठाणे हददीत वेळोवेळी कोबिंग ऑपरेश करण्यात येत आहे व पायदळ पेट्रोलिंग सुध्दा करण्यात येत आहे व पोलीस ठाणे हददीत नाकाबंदी लावण्यात येत आहे. अश्या प्रकारे हददीतील गुन्हेगारांवर वचक राहील पाहीजे करीता या रितीने कार्यवाही करण्यात आली आहे.

सदर कार्यवाही ही मा.अप्पर पोलीस आयुक्तः उत्तर विभाग, मा.पोलीस उपायुक्त परीमंडह क्रमांक २, सहायक पोलीस आयुक्त सिताबर्डी विभाग नागपुर शहर व वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनामिका मिर्झापुरे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सुमेदकुमार जाधव, पोउपनि शुभम बकाल, पोहवा योगेश चांभारे, पोहवा सुधीर मेश्राम, पोना अमोल लोणकर, पोअं हरीश कामडी, पोअं मूकेश कोरे, पोअं विजय दंदी, पोअं भुवनेश्वर मोहोड, पोअं शैलेष गौर, पोअं प्रितम मोरे, पोअं प्रविण काळे यांनी वर नमूद कार्यवाही करण्यात आलेली आहे.

# राज्यात ८९.६५ कोटींची वीज चोरी उघड: महावितरणच्या पथकांकडून १,२४२ ग्राहकांवर गुन्हे दाखल

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर - महावितरणच्या 'सुरक्षा व अंमलबजावणी' विभागांतर्गत कार्यरत ६३ भरारी पथकांनी राज्यभरात वीजचोरीविरोधात मोठी मोहीम राबवली आहे. एप्रिल ते डिसेंबर २०२५ या नऊ महिन्यांच्या कालावधीत ६,६८७ वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आणली आहेत. यामध्ये सुमारे ८९ कोटी ६५ लाख रुपयांची वीजचोरी व अनियमितता समोर आली असून, १,२४२ ग्राहकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एकूण ८९ कोटी ६५ लाख रुपयांपैकी ६१ कोटी ९२ लाख रुपयांची वसुली करण्यात आली आहे.

नागपूर विभागाने या मोहिमेदरम्यान सुमारे ३५ कोटी ९५ लाख रुपयांची वीजचोरी व अनियमितता उघडकीस आणली आहे. या प्रकरणी ३०८ ग्राहकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. भरारी पथकांनी विदर्भातील एकूण ७,७७१ ग्राहकांच्या वीज जोडण्यांची कसून तपासणी केली. यात घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक अशा सर्व प्रकारच्या ग्राहकांचा समावेश होता.

या तपासणी मोहिमेत धक्कादायक वास्तव समोर आले असून, तब्बल २,२१४ ग्राहकांकडे थेट वीजचोरी होत असल्याचे निष्पन्न झाले. या चोरांविरुद्ध विद्युत कायदा २००३ मधील सुधारित कलम १३५ अन्वये कडक कारवाई करण्यात आली आहे. या एकाच कलमांतर्गत २५.४३ कोटी रुपयांच्या वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आली आहेत.

थेट वीजचोरीव्यतिरिक्त, विजेचा अनधिकृत वापर किंवा मंजूर भारापेक्षा अधिक वापर करणाऱ्या ग्राहकांवरही महावितरणने लक्ष केंद्रित केले आहे. विद्युत कायदा २००३ च्या कलम १२६ अन्वये एकूण ८९० प्रकरणांमध्ये १०.५२ कोटी रुपयांची अनियमितता उघड झाली आहे. वीजचोरी आणि अनियमितता अशा दोन्ही कारवाया मिळून एकूण ३५ कोटी ९५ लाख रुपयांच्या दंडाचे निर्धारण करण्यात आले होते, त्यापैकी ३१ कोटी ०३ लाख रुपयांची विक्रमी वसुली महावितरणने संबंधित ग्राहकांकडून केली आहे.

चोरीची रक्कम आणि दंडाचा भरणा करण्यास टाळाटाळ करणाऱ्या ग्राहकांच्या विरोधात महावितरणने आता पोलीस कारवाईचा बडगा उगारला आहे. नागपूर परिक्षेत्रातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये एकूण ३०८ वीज ग्राहकांविरुद्ध वीजचोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे वीजचोरी हा केवळ दंडनीय अपराध नसून, तो फौजदारी गुन्हा आहे, असा स्पष्ट संदेश महावितरणने दिला आहे.

# नागपूर महापालिका निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज:पोलिंग पार्ट्या ईव्हीएमसह मतदान केंद्राच्या दिशेने रवाना

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर महापालिका निवडणुकीसाठी प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली आहे. मतदान केंद्रांवर जाण्यासाठी पोलिंग पार्ट्या रवाना झाल्या असून, उद्या, गुरुवार, १५ जानेवारी रोजी सकाळी ७:३० वाजल्यापासून शहरात मतदान प्रक्रिया सुरू होईल.

नागपूर शहरात एकूण ३८ प्रभाग आहेत. यापैकी ३७ प्रभाग चार सदस्यीय, तर एक प्रभाग तीन सदस्यीय आहे. नागपूरकर एकूण १५१ नगरसेवकांची निवड करणार आहेत. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी शहरात सुमारे १६ हजार कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून, ५ हजार पोलीस कर्मचारी सुरक्षा व्यवस्थेसाठी तैनात असतील.

महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी शहरात एकूण २४ लाख ८३ हजार ११२ मतदार नोंदणीकृत आहेत. यामध्ये १२ लाख २६ हजार ६९० पुरुष मतदार, १२ लाख ५६ हजार १६६ महिला मतदार आणि २५६ इतर मतदारांचा समावेश आहे. शांततेत व पारदर्शकपणे मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी शहरात एकूण ३००४ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत.

यापैकी ३२१ मतदान केंद्रे संवेदनशील घोषित करण्यात आली असून, तेथे कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. या केंद्रांवर पोलिसांची विशेष नजर असेल. महिला मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रत्येक झोनमध्ये एक मतदान केंद्र पूर्णतः महिला कर्मचाऱ्यांमार्फत चालवले जाईल, ज्यांना 'पिंक बुथ' असे नाव देण्यात आले आहे.

तसेच, प्रत्येक झोनमध्ये एक 'आदर्श बुथ' तयार करण्यात आला असून, तेथे मतदारांसाठी सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. ज्येष्ठ नागरिकांसाठी मतदान केंद्रांवर रॅम्पची सुविधा, तर दिव्यांग मतदारांसाठी व्हीलचेअरची व्यवस्था करण्यात आली आहे. मतदानाचे प्रमाण वाढावे आणि सर्व मतदारांना सुरक्षित व सुलभ मतदान करता यावे, यासाठी प्रशासनाने सर्वसमावेशक उपाययोजना केल्या आहेत.





# विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे काटोल जिल्हा अधिवेशन उत्तम प्रतिसाद

## शिक्षकांचे प्रश्न व समास्यावर चर्चा व निराकरण, सुमारे पाचशे शिक्षकांची लक्षणीय नोंदणी

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

काटोल : विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हा अधिवेशन रविवार, 11 जानेवारीला बनारसीदास रुईया हायस्कूल, काटोल येथे अत्यंत उत्साहात व नियोजनात पार पडले. अधिवेशनास जिल्ह्यातील सुमारे पाचशे शिक्षकांनी उपस्थिती नोंदवली. अधिवेशनाचे उदघाटन माजी मंत्री अनिल बाबू देशमुख यांचे हस्ते पार पडले. त्यांनी शिक्षण मंत्री असतांना केलेल्या सुधारणा व योजनाची माहिती देतांना आजचे समस्यावर प्रकाश टाकला.यावेळी मुख्य मार्गदर्शक शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षकांचे सोडविले सामूहिक प्रश्न अधिवेशनात लावून धरलेले पंचतारांकीत, लक्षवेधी प्रश्न व भूमिका याबाबत अनुभव सांगितले.सातपैकी एकमेव विरोधी बाकातील शिक्षक आमदार असून शिक्षकांचे प्रश्न लावून धरणे,सोडविण्यासाठी मला आपणामुळे यश आले आहे. आपल्या समस्या सोडविण्यासाठी मी कटीबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षस्थान माजी शिक्षक आमदार श्री. व्ही. यू. डायगव्हाणे यांनी आपण केलेल्या कार्याचा आढावा देत शिक्षकांनी मोठया प्रमाणात संघटित होऊन आपले प्रश्न सोडविण्यासाठी संघटनेला मदत करण्याचे आव्हान केले.

कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष डॉ. दिलीप चांडक,सचिव प्रकाश नबीरा प्रांतिक अध्यक्ष अरविंद देशमुख, दिलीप कडू अमरावती, प्रांतिक उपाध्यक्ष रमेश काकडे, विजुक्ता महासचिव डॉ. अशोक गव्हाणकर, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळचे सदस्य विश्वास गोतमारे, जिल्हा अध्यक्ष अनिल गोतमारे, जिल्हा कार्यवाह संजय वारकर, प्रशांत पिंपळकर, तसेच बनारसीदास रुईया हायस्कूलच्या प्राचार्या वंदना काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अधिवेशनादरम्यान जिल्ह्यातील सेवानिवृत्त प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षकांचा दीर्घकाळ शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य व योगदानाबद्दल त्यांचा सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

अधिवेशनात शिक्षकांच्या प्रलंबित समस्या, सेवाशर्ती, शिक्षक भर्ती, संचमान्यता, अनुदान,शैक्षणिक धोरणे व शासन निर्णय (GR) अंमलबजावणी यावर सखोल चर्चा झाली.

प्रास्ताविक संजय वारकर यांनी केले. सूत्रसंचालन हेमंत चोपडे यांनी प्रभावीपणे केले. तर आभार प्रदर्शन जिल्हा सहसचिव सचिन इंगोले यांनी केले.

अधिवेशनाचे संपूर्ण नियोजन विजय चौधरी, तालुकाध्यक्ष गणेश जिचकार, तालुका सर्व पदाधिकारी यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता बनारसीदास



रुईया हायस्कूल, काटोल येथील हर्षाली ढोक, मीनल गिरडकर, ममता पिपरे, धनश्री देशमुख, किरण मोरे, रुपाली तायडे, शुभांगी गजभिये तसेच अमोल जवंजाळ, देवानंद बोरकर, नारायण कावडकर, सागर ढोके, पराग करांडे, फहीम शेख, अमोल कोट्टेवार यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## महत्त्वाचे...

### मृत समजून अंत्यविधीची तयारी

**दोन तासांत 103 वर्षांच्या आजीला 'नवजीवन'!**



रामटेक: नागपूर जिल्ह्यातील रामटेक शहरातील आंबेडकर वॉर्डात एक विलक्षण आणि थक्क करणारी घटना घडली. तब्बल 103 वर्षांच्या गंगाबाई सावजी साखरे यांना मृत समजून त्यांच्या अंत्यविधीची संपूर्ण तयारी करण्यात आली होती. मात्र, अवघ्या दोन तासांतच त्यांच्या पायाच्या बोटांची हालचाल दिसून आली आणि गंगाबाई जिवंत असल्याचे स्पष्ट झाले. या घटनेमुळे कुटुंबीयांसह संपूर्ण परिसरात आश्चर्य आणि कुतूहलाचे वातावरण निर्माण झाले.गंगाबाई साखरे या मूळच्या चारगाव (ता. रामटेक) येथील असून सध्या त्या रामटेकच्या आंबेडकर वॉर्डात आपल्या मुलगी कुसुमा अंबादे यांच्या घरी वास्तव्यास होत्या. गेल्या दोन महिन्यांपासून त्या आजारी असून पूर्णतः बेडरेस्टवर होत्या. त्या बोलू शकत नव्हत्या आणि दररोज केवळ पाण्यावर त्यांचा दिनक्रम सुरू होता. वयाच्या शतकापलीकडे पोहोचलेल्या गंगाबाईंची प्रकृती अत्यंत नाजूक असल्याने कुटुंबीय सतत काळजीत होते.12 जानेवारी रोजी सायंकाळी सुमारे पाचच्या सुमारास गंगाबाईंच्या शरीराची कोणतीही हालचाल दिसून आली नाही. श्वासोच्छ्वासही थांबल्यासारखा वाटल्याने कुटुंबीयांनी त्यांना मृत समजले. त्यानंतर लगेचच नातेवाईकांना फोनवरून निधनाची माहिती देण्यात आली. सोशल मीडियावरही वार्ता पसरली. घरासमोर मंडप उभारण्यात आला, अंत्ययात्रेची वेळ निश्चित करण्यात आली आणि शववाहिनीची व्यवस्था करण्यात आली. अंत्यसंस्काराच्या तयारीनुसार गंगाबाईंना नवीन वस्त्रे घालण्यात आली, हात-पायांची बोटे बांधण्यात आली आणि नाकात कापूस ठेवण्यात आला.दरम्यान, सायंकाळी सुमारे सातच्या सुमारास नातू राकेश साखरे यांचं लक्ष गेलं आणि अचानक आजीच्या पायाच्या बोटांची हालचाल झाली. सुरुवातीला विश्वास न बसल्याने त्यांनी बारकाईने पाहणी केली. त्वरित बोटांची बांधणी सोडण्यात आली आणि नाकातील कापूस काढण्यात आला. तेवढ्यात गंगाबाईंनी जोरात श्वास घेतला.

### गंगाधरराव ठाकरे गुरुजी यांचे निधन



काटोल - सर्वोदय विद्यालय हिंगणा येथील सेवानिवृत्त शिक्षक स्व. गंगाधरजी दत्तूजी ठाकरे (वय 75) ह मु वरुड (जिचकार सावंगी) यांचे नागपूर येथे उपचारा दरम्यान दि 13 जानेवारीला रात्री 12: 30 ला रुग्णालयात निधन झाले.त्यांचेवर मंगळवारला दुपारी 2 वाजता मुलताई रोड वरुड येथील स्मशान भूमीत अंतिम संस्कार पार पडले.

### शेषरावजी वरोकर यांचे निधन



पारडसिंगा निवासी शेषरावजी उकंडराव वरोकर (वय 92) यांचे बुधवारला मध्यरात्री वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे मागे मुलगा माजी मुख्याध्यापक दिलीप वरोकर, सुभाष नातू गौरव, सून, नातवंडे आप्त परिवार आहे. त्यांचेवर पारडसिंगा स्मशान भूमीत दुपारी अंतिम संस्कार पार पडले.

## महत्त्वाचे...

### मुख्य मार्गावरील अतिक्रमण हटवल्याने वाहतूक सुरळीत



अमरावती : शहरातील मुख्य जवाहर मार्गावर फेरीवाल्यांच्या अतिक्रमणामुळे वाहतुकीला अडचण येत होती. त्यामुळे वाहनचालकांना कसरत करत मार्गक्रमण करावे लागत होते. यावर नियंत्रणासाठी पोलिस निरीक्षक अमोल माळवे यांच्या मार्गदर्शनात अकोट पोलिसांनी कारवाई करत अतिक्रमण हटवले.अकोट शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जयस्तंभ चौक या मुख्य मार्गावर फेरीवाल्यांनी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केले आहे. हे फेरीवाले वाटेल त्या ठिकाणी आपल्या हातगाड्या लावून वाहतुकीची कोंडी करत आहेत. यामुळे बरेचदा या ठिकाणी किरकोळ वाद सुद्धा झाले आहेत. पोलिसांनी या हातगाडी चालकांवर बऱ्याचदा कारवाई केली. परंतु तरीही ते आपल्या हातगाड्या पुन्हा त्या ठिकाणी लावतात. या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. मंगळवारी (दि.१३) या ठिकाणी फेरीवाल्यांनी आपल्या हातगाड्या रस्त्यावर लावून रहदारीला अडथळा निर्माण केल्याचे समजताच अकोट शहर पोलिस ठाण्याचे ठाणेदार अमोल माळवे यांनी फेरीवाल्यांवर कारवाई करत सदर गाड्या पोलिस ठाण्यात लावल्या. इतर वेळी वाहतूक पोलिस दिसताच हातगाडी चालक त्या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोबारा करतात.

### यवतमाळकरांनी थकवले 7 कोटी; वाहतूक नियम मोडण्यामध्ये अव्वल



यवतमाळ-वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांविरुद्ध प्रशासनाने ऑनलाईन ई-चलनचा धाक निर्माण केला असला, तरी दंड भरण्याबाबत वाहनधारक कमालीचे उदासीन असल्याचे समोर आले आहे. गेल्या वर्षभरात जिल्ह्यात तब्बल १ लाख ३६ हजार जणांवर कारवाई करण्यात आली, मात्र त्यापैकी १ लाख ३ हजार वाहनचालकांनी अद्याप ७ कोटींहून अधिक रुपयांचा दंड भरलेला नाही.

डिजिटलचे वारे आता सर्वच क्षेत्रात वाहत आहेत. मागील काही वर्षांत ऑनलाइन व्यवहारांकडे नागरिकांचा कल अधिक वाढला आहे. सरकारकडून डिजिटल व्यवहाराला प्रोत्साहनसुद्धा दिले जात आहे. त्यामुळे शासकीय विभागानेही ऑन लाइनकडे मोर्चा वळवला आहे. बहुतांश जणांचे कामे एका क्लिकवर होत आहेत. हा ऑनलाइनचा फॉर्म्यूला आता वाहतूक पोलिस विभागाने वापरला असून, ई-चलान पद्धत चालू केली आहे. जेणेकरून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्याकडून ई-चलानच्यामार्फत दंड वसूल करता यावा, चालकांना कितीही शिस्तीचे धडे दिले तरी नियम पायदळी तुडवणाऱ्या चालकांची संख्या कमी नाही. विभाग अद्ययावत करण्यासाठी सन २०१९ मध्ये वाहतूक पोलिसांकडे एम स्वॅप मशीन देण्यात आल्या आहेत. ऑनलाइन पद्धतीने आपल्या वाहनावर दंड केल्याचे अनेक वाहन धारकांना माहीतच नसल्याचे समोर येते आहे. आरटीओ कार्यालयात नोंदवलेला मोबाइल क्रमांक अस्तित्वात नसणे, बदललेला असणे, बंद असणे यामुळे दंड झाल्याचा एसएमएस येत नाही. त्यामुळेच वाहनधारक अनभिज्ञ राहत आहेत.

# चंद्रपूरच्या अलीची गुजरात येथे अखिल भारतीय सागरी जलतरणात झेप

## आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने कोक्लिअर प्रोसेसर शस्त्रक्रियेनंतर अलीचा आत्मविश्वास पुन्हा उभा राहिला

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

चंद्रपूर : जन्मजात गहन श्रवणबाधा असतानाही जिद्द, चिकाटी आणि संवेदनशील नेतृत्वाच्या पाठबळावर चंद्रपूरच्या अली मुहम्मद रियाझखान घौरी या विशेष बालकाने अखिल भारतीय स्तरावर प्रेरणादायी यश संपादन केले आहे. गुजरात राज्यातील पोरबंदर येथे नुकत्याच पार पडलेल्या अखिल भारतीय ५ कि.मी. सागरी जलतरण स्पर्धेत अलीने द्वितीय क्रमांक मिळवत चंद्रपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. विशेष म्हणजे राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून काही महिन्यांपूर्वी या बालकावर कोक्लिअर प्रोसेसर शस्त्रक्रिया झाली होती. त्यानंतर अलीच्या आत्मविश्वासाला भरारी मिळाली आणि आता त्याने आपली क्षमता सिद्ध केली. अली हा द्विपक्षीय कोक्लिअर इम्प्लांट केलेला विशेष बालक आहे. सन २०२३ मध्ये त्याच्या एका साऊंड प्रोसेसरमध्ये गंभीर तांत्रिक बिघाड झाल्याने तो पूर्णपणे बंद पडला होता. इयत्ता १० वीच्या महत्त्वाच्या शैक्षणिक टप्प्यावर असताना एका प्रोसेसरवर शिक्षण, दैनंदिन जीवन आणि क्रीडा सराव करणे अलीसाठी अत्यंत कठीण झाले. साऊंड प्रोसेसरची किंमत लाखोंमध्ये असल्याने कुटुंबासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले होते. शासकीय योजनांमध्ये कोक्लिअर इम्प्लांटनंतर पुन्हा साऊंड प्रोसेसर देण्याची तरतूद नसतानाही, ही बाब मानवीय आणि अपवादात्मक असल्याचे ओळखून आ. सुधीर मुनगंटीवार यांनी खनिज निधी अंतर्गत विशेष बाब म्हणून सुमारे सात लक्ष रुपयांचा निधी मंजूर करून दिला. या निधीतून अलीसाठी नवीन साऊंड प्रोसेसर उपलब्ध झाला आणि त्याचे थांबलेले आयुष्य पुन्हा गतीमान झाले. या मोलाच्या मदतीमुळे अलीने यशस्वीरित्या इयत्ता १० वी परीक्षा उत्तीर्ण केली. हरवलेला आत्मविश्वास पुन्हा मिळवत त्याने पोहण्याच्या सरावाला नवे बळ दिले आणि त्याच आत्मविश्वासाच्या जोरावर ४ जानेवारी रोजी पोरबंदर येथे झालेल्या समुद्री पोहणे स्पर्धेत देशभरातील स्पर्धकांना मागे टाकत द्वितीय क्रमांक पटकावला. शासनाच्या नियमांच्या चौकटीपलीकडे जाऊन मानवीय दृष्टिकोनातून दिलेली ही मदत केवळ आर्थिक नव्हे, तर एका विशेष बालकाच्या जीवनाला



नवी दिशा देणारी ठरली आहे. अलीच्या या यशामुळे चंद्रपूर जिल्ह्याचा गौरव वाढला असून आ. सुधीर मुनगंटीवार यांची संवेदनशील नेतृत्व समाजात किती मोठा सकारात्मक बदल घडवू शकते, याचे हे जिवंत उदाहरण ठरले आहे.

# भंडारा जिल्ह्यात माणुसकीला काळीमा:काळ्या बॅगेत फेकून दिलेली नवजात बालिका जिवंत सापडली

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

भंडारा :10 दिवसांच्या एका बालिकेला काळ्या बॅगेत रस्त्याच्या कडेला फेकून देण्यात आल्याची भयंकर घटना भंडारा जिल्ह्यातील लाखणी परिसरात घडली आहे. या घटनेचा एक व्हिडिओ सोशळ मीडियात व्हायरल झाला आहे. त्यात ही गोंडस चिमुकली हातपाय हलवताना दिसून येत आहे. सध्या या बालिकेवर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

यासंबंधीच्या माहितीनुसार, लाखणी परिसरातील पिंपळगाव सडक येथे ही घटना घडली आहे. अज्ञात व्यक्तीने मंगळवारी दुपारी 8 ते 10 दिवसांच्या एका जिवंत मुलीला प्लास्टिकच्या काळ्या रंगाच्या बॅगमध्ये बांधून फेकून दिले. ही बॅग रस्त्याशेजारच्या एका शेतालगत असणाऱ्या झाडाजवळ फेकून दिली होती. या बॅगेत हालचाल होत होती व



तिच्यातून वासही येत होता. ही बाब रस्त्याने ये-जा करणाऱ्या वाटसरूंच्या लक्षात आली. त्यांनी जवळपासून त्या बॅगेची पाहणी केली. त्यानंतर बॅग उघडून पाहिली असता त्यात अंदाजे 8 ते 10 दिवसांची एक नवजात बालिका आढळून आली. हे दृश्य पाहून नागरीक सुन्न झाले.

पोलिस आणि प्रशासनाची तत्परता

या घटनेची माहिती मिळताच लाखणी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुभाष बारसे आपल्या पथकासह तातडीने घटनास्थळी पो होचले. पोलिसांनी पाहिले अस ता ती बालिका जिवंत असल्याचे लक्षात आले. त्यानंतर कोणताही विलंब न लाव ता त्यांनी चिमुकलीला ग्रामीण रुग्णालय, लाखणी येथे उप चारासाठी दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर तिला पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, भंडारा येथे हलवण्यात आले. सध्या तिच्यावर तिथेच उपचार सुरू आहेत.

वैद्यकीय सूत्रांच्या माहितीनुसार, सध्या बालिकेची प्रकृती स्थिर आहे. मात्र, इतक्या ल हान जिवाला अशा प्रकारे उ घड्यावर सोडून जाणाऱ्या निर्दयी पालकांविरोधात प रि सरातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.


पोलिसांच्या मते, सदर मुलीचा जन्म अनैतिक संबंधांतून झाला असावा. त्यामुळे तिला रस्त्यावर फेकून देण्यात आले. लाखणी पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

# संविधानामुळे स्त्रीयांची सर्वच क्षेत्रामध्ये यशस्वीपणे वाटचाल डॉ. गवई - सावित्रीबाई फुले जन्मशताब्दीनिमित्त घेतला उपक्रम

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर : दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीद्वारे संचालित श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालयाच्या इंटरनल कम्प्लेंट कमिटी, वुमन्स सेल व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले यांच्या जन्मशताब्दी निमित्त एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्त्रीमुक्ती चळवळ, या विषयावर सीताबाई आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमधील विभागप्रमुख डॉ. प्रसन्नजीत गवई यांनी व्याख्यान दिले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे स्त्रीया सर्वच क्षेत्रात आत्मविश्वासने पुढे येत असल्याचे डॉ. गवई म्हणाले.

कार्यशाळा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील डॉ.



बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्राच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात पार पडली. डॉ. प्रसन्नजीत गवई यांनी प्रभावी व्याख्यान दिले. त्यांनी आपल्या व्याख्यानात स्त्रिया सर्वच क्षेत्रात आत्मविश्वासने पुढे येतांना दिसत असून, यामागे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान आहे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दि बीजीई सोसायटी, अकोलाचे अध्यक्ष ॲड. मोतीसिंहजी मोहता यांची उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात स्त्रियांनी शिक्षणासाठी मोबाईलचा वापर टाळावा, मोबाईलद्वारे प्राप्त होणारी माहिती सत्यच असेलच असे सांगता येत नाही. त्यामुळे ग्रंथलयात जावून पुस्तके वाचावीत असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आय.सी.सी. वुमन्स सेलच्या समन्वयिका डॉ. रश्मी जोशी, डॉ. अर्चना सावरकर, डॉ. सोनाली गवांदे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. कविता हेडा, डॉ. शैलेश जयस्वाल, शिक्षकेतर कर्मचारी दिपक वानखडे, चंद्रकांत अहिरकर, श्रीमती ज्योती गिते यांनी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ.आर.डी. चंद्रवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली परिश्रम घेतले. या कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालयांतील एकूण २३१ विद्यार्थी विद्यार्थीनींनी सहभाग घेतला. महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमास यशस्वी केले. कार्यशाळा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्राच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात पार पडली.

# माँ राजमाता जिजाऊंचे संस्कारशील मातृत्व आजच्या पिढीसाठी दीपस्तंभ:स्वामी विवेकानंद-राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त पुरस्कार वितरण सोहळा

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

अकोला- स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त अकोला येथे पुरस्कार वितरण सोहळा वितरण सोहळा पार पडला. खडकी अकोला येथील अखिल भारतीय मराठा सेवा संघ, डी.एम.के. सेवा मंडळ, निर्भय बनो जनआंदोलन यांच्या संयुक्त विद्यमाने सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री वासुदेवराव महल्ले महाराज (अध्यक्ष, श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, अकोट) हे विराजमान



होते.

स्वामी विवेकानंदांचे राष्ट्रनिर्मितीचे विचार आणि राजमाता जिजाऊंचे संस्कारशील मातृत्व आजच्या पिढीसाठी दीपस्तंभ असल्याचे महल्ले महाराज म्हणाले. समाजघडणीसाठी अविरत कार्य करणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. त्यामध्ये राष्ट्रीय पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार किसान ब्रिगेडचे अध्यक्ष डॉ. प्रकाश पोहरे, दत्तात्रेय निघाने, जिजाऊ जनसेवा प्रेरणा पुरस्कार वैशाली राऊत, डॉ. अर्चना देशमुख, ललिता पाथरीकर, भारती पाथ्रीकर, प्रतिभा पाथ्रीकर, शंकरराव बोर्डे यांना प्रदान करण्यात आला. स्वामी विवेकानंद प्रेरणा पुरस्कार प्रदीप खाडे, धनंजय मिश्रा, दिवाकर गावंडे, प्रदीप गावंडे, सिद्धार्थ तायडे, सुरेश पाथरिकर, डॉ. चंद्रशेखर गोंधळ, बळवंतराव कडू, अक्षय राऊत, बाळाभाऊ पाथरीकर, आदींना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री वासुदेवराव महल्ले महाराज हे होते. स्वामी विवेकानंदांचे राष्ट्रनिर्मितीचे विचार आणि राजमाता जिजाऊंचे संस्कारशील मातृत्व आजच्या पिढीसाठी दीपस्तंभ असल्याचे महल्ले महाराज म्हणाले. प्रस्ताविक प्रा. दादाराव पाथ्रीकर यांनी केले.

# ट्रकच्या धडकेमध्ये विद्यार्थ्याचा मृत्यू:मार्डी ते अमरावती या मार्गावरील तपोवन परिसरात झाला अपघात

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मार्डीकडून अमरावतीच्या दिशेने येणाऱ्या एका ट्रकने समोरुन येणाऱ्या एका दुचाकीस्वार विद्यार्थ्याला धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वार २२ वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू झाला आहे. हा अपघात सोमवारी १२ जानेवारीला सायंकाळी मार्डी ते अमरावती मार्गावरील तपोवन परिसरातील संत गाडगे बाबा कॉलनीजवळ झाला आहे. अक्षय प्रविणराव सोलव (२२, रा. कविठा बुद्रूक अचलपूर) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे.



अक्षय सोलव त्याच्या दुचाकीने विद्यापीठाकडून मार्डीच्या दिशेने जात होता. तो संत गाडगेबाबा कॉलनीजवळ पोहोचला असता विरुद्ध दिशेने ट्रक आला व ट्रकने थेट अक्षयच्या दुचाकीला चिरडले. यामध्ये अक्षय गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी रुग्णालयात नेले असता त्याचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी अक्षयचे काका नितीन सोलव यांच्या तक्रारीवरुन फ्रेजरपुरा पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# कृषी अधिकाऱ्याची शेतकऱ्याला बुटाने मारहाण:वाशिममधील प्रकार संत्री फळबागाच्या अनुदानाची विचारणा केल्याने सुटला संयम

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

एका मुजोर कृषी अधिकाऱ्याने शेतकऱ्याला बुटाने मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यातील गोगरी परिसरात ही घटना घडली. मनरेगा योजनेअंतर्गत संत्री फळबागेच्या अनुदानाबाबत विचारणा केल्याने तालुका कृषी अधिकाऱ्याने बुटाने व मातीच्या ढेकळाने मारहाण केल्याचा संतापजनक प्रकार घडला. यासंबंधीचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

सचिन कांबळे असे मारहाण करणाऱ्या कृषी अधिकाऱ्याचे नाव आहे. त्याने ऋषिकेश पवार या तरुण शेतकऱ्याला मारहाण केल्याचे समजते. हे प्रकरण पोलिसांपर्यंत गेले. मात्र, ते सामोपचाराने मिटवण्यात आले.

अनुदान रखडले होते

मिळालेल्या माहितीनुसार, गोगरी येथील तरुण शेतकरी ऋषिकेश पवार यांनी दोन वर्षांपूर्वी आपल्या तीन एकर शेतात मनरेगा योजनेंतर्गत संत्री फळबाग लावली होती. या फळबागेसाठी शासनाकडून मिळणारे अनुदान गेल्या चार महिन्यांपासून रखडल्याचा त्यांचा दावा आहे. दरम्यान, मंगरुळपीरचे तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे हे गोगरी शिवारात पाहणीसाठी आले असता, ऋषिकेश पवार यांनी त्यांच्याकडे रखडलेल्या अनुदानाबाबत विचारणा केली.

नंतर म्हणे तुला अडकवीन

आरोपानुसार, यावेळी झालेल्या वादात तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे यांनी संतापाच्या भरात शेतकऱ्याच्या अंगावर धाव घेत पायातील बुटाने मारहाण केली. तसेच शेतातील मातीची ढेकळे उचलूनही मारल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेदरम्यान संबंधित अधिकाऱ्याने 'तुला गुन्ह्यात अडकवीन' अशी धमकी दिल्याचाही आरोप शेतकऱ्याने केला आहे. या घटनेची माहिती परिसरात पसरताच शेतकरी संघटनांचे पदाधिकारी व स्थानिक शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त करत निषेध नोंदवला आहे.

शेतकरी संघटना आक्रमक

मारहाण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तालुक्यातील शेतकरी संघटनांनी केली आहे. दरम्यान, तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे यांनी शेतकरी ऋषिकेश पवार यांना बुटाने मारहाण केल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून, त्यामध्ये शेतकऱ्याला बुटाने मारहाण होत असल्याचे दृश्य दिसत असल्याचा दावा केला जात आहे.

उपोषणाचा दिला होता इशारा

शेतकरी ऋषिकेश पवार यांनी वाशिम जिल्ह्याचे अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. गोगरी, हिरंगी, खेर्डा बु., खुर्दा खु. येथील सुमारे 15 फळबाग उत्पादक शेतकरी रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग गटापासून वंचित असल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले होते. संबंधित गट न काढल्यामुळे शेतकरी शासनाच्या विविध योजनांच्या लाभापासून वंचित राहत असल्याचा आरोप त्यांनी केला होता. तसेच प्रलंबित गट तत्काळ काढून देण्यात यावेत, अन्यथा आमरण उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी निवेदनातून दिला होता.

पोलिसात गेले, पण...



शेतकऱ्याच्या इशाऱ्यानंतर तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे, कृषी सहाय्यक तसेच कृषी विभागातील इतर अधिकारी व कर्मचारी मंगळवारी गोगरी गावात दाखल झाले होते. यावेळी एका शेतात फळबागेची पाहणी करत असताना शेतकरी व अधिकाऱ्यांमध्ये चर्चा सुरू होती. त्यावेळी ऋषिकेश पवार यांनी व्हिडीओ चित्रीकरण केले, यामुळे तालुका कृषी अधिकारी संतप्त झाल्याचे सांगितले जात आहे.यानंतर शेतकरी व अधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक वाद होऊन कृषी अधिकाऱ्यांनी रागाच्या भरात बुट काढून शेतकऱ्यावर हल्ला केल्याचे व्हिडीओत दिसून येत आहे. हे प्रकरण मंगरुळपीर पोलीस ठाण्यात पोहोचले असून, दोन्ही बाजूंनी हे प्रकरण आपसात मिटवण्यात आल्याची माहिती आहे.

# प्रचारातला विचार

या निवडणुकांमध्ये प्रचाराचा जोश जरा जास्तच होता. पण अशा प्रचारांत हवेतली आश्वासनं आणि प्रत्यक्ष जमिनीवरील आश्वासनं यातला फरक मतदार समजून आहे. समोरच्याच्या बोलण्याला नीट पारखूनच तो त्याला प्रतिसाद देतो. विश्वासार्हताच निवडणूक काळात सत्ताधारी पक्षाचं भांडवल ठरत असतं.

निवडणुकीत मतं मिळवण्याचंही शास्त्र आहे. फार खोलात न जाता त्यातील अगदी प्राथमिक दोन गोष्टींचा विचार करू. मतदाराला आपल्याकडे आकर्षित करायचं, तर त्याला विकासाची स्वप्नं तरी दाखवावी लागतात किंवा त्याच्या मनात कोणती तरी भीती पेरावी लागते. त्याला असुरक्षित वाटण्याएवढी ही भीती प्रभावी असावी लागते. ज्याच्याकडे जे सांगण्यासारखं असेल, जे सर्वात सोयीचं असेल, ते तो पक्ष किंवा नेता निवडतो. मुंबई आणि राज्यातील अन्य महापालिकांच्या निवडणूक प्रचारात हे चित्र अगदी ठळकपणे दिसत होतं. मुंबईच्या 'मराठी अस्तित्वा'चा मुद्दा हे शिवसेनेचं जुनं हत्यार आहे. हे हत्यार गंजत चालल्याचा साक्षात्कार शिवसेनेला खरं तर फार पूर्वीच झाला होता. भारतीय जनता पक्षाला सोबत घेऊन म्हणूनच त्यांनी हिंदुत्वाचा झेंडा हाती घेतला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे 'हिंदुहृदयसम्राट' होते. प्रखर हिंदुत्वाचे देशात तेच प्रतीक होते. त्यांच्यामागे ज्यांनी शिवसेनेचा ताबा घेतला, त्यांना हा हिंदुत्वाचा झेंडा पेलवणं शक्यच नव्हतं. समोर भारतीय जनता पक्षासारखा राष्ट्रीय पक्ष हिंदुत्वाच्या मुद्द्यावर संपूर्ण देशात ठाम उभा असल्याने मतदारांनी साहजिकच हिंदुत्वाचा झेंडा त्यांच्या हाती दिला. अस्तित्वासाठी उबाठाने काँग्रेसबरोबर हातमिळवणी केल्यानंतर तर त्यांची हिंदुत्वाबरोबरची नाळच तुटली! त्यामुळे, आता पुन्हा 'मराठीपणा'ला हात घालून हिंदू मतदारांमध्ये फूट पाडण्याशिवाय त्यांच्यापुढे पर्यायच उरला नाही. त्यांनी तेच केलं. संपूर्ण प्रचारात मराठी माणसाला लक्ष्य करून त्याच्या मनात वेगवेगळे भयगंड पेरण्याचा प्रयत्न केला. पण, तो यशस्वी झालेला दिसत नाही. मराठी माणसाच्या मनात स्वतःच्या अस्तित्वाचे, अस्मितेचे अनेक प्रश्न आहेत. पण, त्याबाबत या ठाकरे बंधूंनी याआधी काहीही केलेलं नाही. उद्याही काही करण्याची कुवत त्यांच्यात नाही, हे मराठी माणसाने पुरतं ओळखलं आहे. स्वतःच्या अस्तित्वाच्या भीतीने ठाकरे बंधू आपल्याला घाबरवत आहेत, हे मराठी मतदाराच्या लक्षात आलं आहे. ठाकरे बंधूंच्या प्रचार मोहिमेत त्यामुळेच कुठे जोर, जोश दिसला नाही. त्यांना मिळणारा प्रतिसाद एकदम थंडा होता.

याउलट भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना शिंदे गटाचा प्रचार जोशात होता. त्यांनी नकारात्मकतेऐवजी सकारात्मक सूर पकडला होता. केंद्र आणि राज्यात सत्तेवर असल्यामुळे त्यांच्याकडे केलेल्या विकासकामांची भलीमोठी यादी होती. सुरू असलेली कामं दिसताहेत. त्यामुळे, या दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी जी नवी आश्वासनं दिली, सुरू असलेल्या कामांच्या पूर्ततेबाबत जी माहिती दिली, त्यावर नागरिकांचा विश्वास बसला. ती आश्वासनं पोकळ वाटली नाहीत. राज्यकर्त्यांकडे राज्याची तिजोरी आणि संपूर्ण प्रशासन हाताशी असल्याने ते काहीही आश्वासनं देऊ शकतात, हे मतदारालाही माहीत आहे. त्याला आता त्याची सवय झाली आहे. त्यामुळे, हवेतली आश्वासनं आणि प्रत्यक्ष जमिनीवरील आश्वासनं यातला फरक तो समजून आहे. समोरच्याच्या बोलण्याला नीट पारखूनच तो त्याला प्रतिसाद देत असतो. केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यातील देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने चांगलीच विश्वासार्हता कमावली आहे. ही विश्वासार्हताच निवडणूक काळात सत्ताधारी पक्षाचं भांडवल ठरत असतं. हे भांडवल या प्रचारमोहिमेत भाजप-शिवसेना शिंदे गटाच्या उपयोगी आल्याचं दिसतं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष राज्यात सत्तेवर असला, राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा भाग असला, तरी त्यांनी मुंबई आणि पुण्यासाठी केलेले जाहीरनामे विचारपूर्वक केलेले वाटले नव्हते, असं चित्र उभं राहिलं. पुण्यात सर्वांना मेट्रो आणि शहर बससेवा मोफत करण्याचं आश्वासन त्यांच्या अंगलट आलं. मुंबईसाठी केलेल्या जाहीरनाम्यात त्यांना भटक्या कुत्र्यांचा प्रश्न महत्त्वाचा वाटला! मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच पुण्यात राष्ट्रवादीच्या 'फुकट आश्वासना'ला टाचणी लावली. त्यानंतर सगळ्यांनीच त्याची खिल्ली उडवली. जाहीरनाम्याकडे गंभीरपणे न पाहण्याचे परिणाम त्यांना भोगावे लागले. मतदाराच्या मनात त्यांच्याविषयी यामुळे संशय निर्माण झाला. संपूर्ण प्रचार मोहिमेत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे कुठल्या ना कुठल्या मुद्द्यावर खुलासे आणि स्पष्टीकरणं देत फिरत होते.उघड प्रचार काल संध्याकाळी संपला. गेले दहा दिवस जो प्रचार झाला, शिवसेनेच्या ज्या सभा झाल्या, त्यातली वक्तव्यं मतदाराच्या कानात गुंजत असतील. या दहा दिवसांत प्रमुख व्यासपीठांवर, प्रचाराच्या पदयात्रांतून त्याला काय दिसलं? एका बाजूला ठाकरे कुटुंबाची स्वतःच्या अस्तित्वासाठी एकत्रित धडपड आणि दुसऱ्या बाजूला भाजप-शिवसेना शिंदे गटाच्या विविध भागातल्या, समाजातल्या नेत्यांचा एकोप्याने प्रचार. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचा प्रचार म्हणजे सत्तेतल्या राष्ट्रवादीला टेकू देण्याची धडपड होती. त्यांचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील सांगलीत काँग्रेसला एकत्र करून लढताहेत. बाकी सगळा पक्ष पवार कुटुंबाचं अधिकृत पक्षमिलन कधी? यातच अडकला आहे. त्यामुळे, कार्यकर्ते हताश, दिशाहीन झाले आहेत. कॅरमच्या सोंगट्या फुटाव्यात, तसा हा पक्ष येत्या काही दिवसांत चहुदिशांना विखरून पडलेला दिसेल. काँग्रेसचं ना पक्षनीतीवर नियंत्रण, ना संघटनात्मक नियोजनावर. मुंबईत वर्षा गायकवाड यांनी आपली स्वतंत्र काँग्रेस चालवली आहे, असं दिसतं. त्या पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांच्या प्रसिद्धी पत्रकांव्यतिरिक्त एवढा मोठा राष्ट्रीय पक्ष प्रचारात कुठे होता? असे प्रश्न आणि प्रत्यक्ष दिसलेलं प्रचारातलं चित्र यावरून उद्या तो ईव्हीएमचं बटन दाबेल. महानगरांमधला मतदार अधिक जागृत, अधिक शहाणा असतो, असा सर्वसाधारण समज आहे. त्यामुळे, या महानगरातून जे मतदान होईल, तो महाराष्ट्राचा कल असेल. यापूर्वी नगरपालिका निवडणुकांतून निमशहरी भागातील मतदारांनी आपला कल स्पष्ट केलाच आहे. जिल्हा परिषद निवडणुकांच्या माध्यमातून महिन्याभरात अगदी ग्रामीण भागातील मतदाराचा कलही उघड होईल. 'विश्वासार्ह विरोधकांचा अभाव आणि सत्ताधारी महायुतीचा प्रभाव' हेच या सगळ्या मतदानातून दिसेल, असा एकूण अंदाज आहे.

# वाढते वायू प्रदूषण चिंताजनक

नागपूर शहरात सध्या जिकडे बघावे तिकडे नुसते बांधकाम दिसून येईल. कुठे उड्डाणपूल तर कुठे मेट्रोचे काम. कुठे रस्त्यांचे बांधकाम तर कुठे नव्या इमारतींचे बांधकाम. इतक्या मोठ्या प्रमाणात बांधकाम सुरू असतांना शहराची हवा दूषित नाही होणार तर काय? शहराच्या या दूषित झालेल्या हवेप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्य सरकारला चांगलेच धारेवर धरल्याचे वृत्त आहे. याप्रकरणी न्यायालयाने राज्याचे मुख्य सचिव, पर्यावरण मंत्रालय, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव, मनपा आयुक्त आणि नागपूर सुधार प्रन्यासला नोटीस बजावून सहा आठवड्यांच्या आत उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहेत. आता यावर वरील सर्व मंडळी काय उपाययोजना करतात हे तेच जाणोत. पण, शेवटी जनतेच्या आरोग्याच्या कारणास्तव न्यायालयास दखल घ्यावी लागत असेल तर प्रदूषण नियामक मंडळ कुठल्या कुंभकर्णी झोपेत आहे? शहरात जागोजागी लावलेले डिजिटल बॅनर आणि त्यावर कधीकाळी दाखविण्यात येणारे प्रदूषणाचे आकडे सध्या शोभेची वस्तू ठरलेले आहेत.

दिवसेंदिवस वाढत चाललेला वाहनांचा धूर अन् एकच दमात काढण्यात आलेले बांधकाम, नागपूरच्या आसपास वाढत चाललेल्या औद्योगिक वसाहती तसेच जाळण्यात येणारा डम्पिंग यार्डमधील घनकचरा यामुळे जनतेला श्वास घेण्यास सुद्धा शुद्ध हवा राहिलेली नाही. एकीकडे शुद्ध हवा मिळावी म्हणून नागपूर वर्धा मार्गावर ऑक्सिजन पार्क उभारल्या जाते आहे आणि दुसरीकडे शहराची हवा प्रदूषित झाली असतांनाही त्याकडे मात्र दुर्लक्ष केल्या जात असेल तर यास काय म्हणावे?

मेट्रो तसेच उड्डाणपूल ही काळाची गरज आहे. पुढील पिढीसाठी केलेली सोय आहे. त्यात कुठलीच शंका नाही. म्हणून सध्या स्थितीत जगत असणाऱ्या जनतेचा जीव धोक्यात आणायचा काय? जर बांधकाम काढले आहे, तर त्यातून होणाऱ्या प्रदूषणासाठी उपाययोजना करणे सुद्धा गरजेचे आहे. जुलै २०२४ मध्ये नीरी आणि आयआयटी बॉम्बे यांनी नागपूरच्या हवे बाबत एक संयुक्त अहवाल तयार केला होता. त्यात शहरातील प्रदूषणाला बांधकाम जबाबदार असल्याचे त्यात म्हटल्या गेले आहे. नीरीने यावर सांगितलेल्या उपाययोजनांवर प्रशासन मूग गिळून गप्प राहिल्याने आज ही परिस्थिती ओढवल्या गेली आहे.

फक्त नागपूर, दिल्ली, मुंबई तसेच पुण्यासारखी शहरेच प्रदूषित झाली नसून सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी अँड क्लीन एअर या संस्थेने केलेल्या पाहणीनुसार भारतातील ४४ टक्के शहरे ही वायू प्रदूषणाचा सामना करत असल्याचे म्हटल्या गेले आहे. सीआरइने २०१९ ते २०२४ या कालावधीत देशातील ४०४१ शहरांतील हवेच्या दर्जाच्या पीएम २.५ या पातळीचा अभ्यास केला. यापैकी १७८७ शहरांमध्ये हवेचा दर्जा पीएम २.५ मानकापेक्षा अधिक होता. असा निष्कर्ष काढण्यात आला आहे. २०२५ मध्ये आसाम मधील बर्नीहाट हे शहर सर्वाधिक प्रदूषित शहर ठरले आहे. त्यानंतर दिल्ली, गाजियाबाद शहरांचा नंबर लागतो. नोएडा, गुरुग्राम, हाजीपूर, मुजफ्फरनगर , हापूर हेही शहरे सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत आहेत.

नागपूर शहराच्या आसपास मोठ्या प्रमाणात औद्योगिक वसाहती वसविल्या गेल्या आहेत. यातून अनेकांना रोजगार मिळाला, ही बाब महत्त्वाची असली तरी, यातून निघणारा धूर आसपासच्या शेतजमिनी नापीक करत आहे, त्याचे काय? चिमणीतून निघणाऱ्या धुराने जवळपास तीन ते चार किलोमीटर पर्यंतच्या भागातील लोकांचे जगणे अवघड केले त्याचे काय? साऱ्या वसाहती विदर्भात वसवून येथील जमिनी नित्कृष्ट करायच्या तसेच प्रदूषणाने येथल्या लोकांचे जगणे अवघड करायचे आणि रोजगार मात्र परप्रांतीय लोकांना द्यायचा. हाच भूभाग काळोखात ठेवून येथील वीज अन्य भागात पुरवल्या जाणे, हे कुठले धोरण म्हणायचे? आता नुकतेच नागपूर जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सुनीता घेर यांनी खापरखेडा औष्णिक वीज केंद्रातील चिमणी व कोळसा हाताळणी यातून निघणाऱ्या धुराची कायमची विल्हेवाट लावण्यात यावी, अशी मागणी केली आहे. खापरखेडा भागात जर गेले तर दोन ते तीन किलोमीटर परिसरात नुसत्या धुराचे साम्राज्य पसरलेले दिसेल, ही परिस्थिती आहे. या धुरामुळे दमा, एलर्जी होऊन श्वसनाचे त्रास बळावले जात असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

रामगड जिल्ह्यातील रुंगटा येथील आलोक स्टील प्रकल्पामुळे आसपास किती धूर साचला जातो, याचा एका युवकाने काढलेला व्हिडिओ नुकतेच व्हायरल झाला होता. त्यावर झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी कडक भूमिका घेत स्थानिक उप जिल्हाधिकाऱ्यांना त्यावर कारवाई करण्याच्या सूचना केल्या आहेत. एकीकडे राजधानी दिल्लीत वाढत चाललेल्या प्रदूषणावर बैठका होऊन चिंता व्यक्त केली जात आहे. हवा शुद्धीकरण यंत्रावरील जीएसटी कमी करा म्हणून सांगितल्या जात आहे. दिल्लीत तंदूर आणि भाजलेले पदार्थ बनविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कोळसा तसेच लाकडी इंधनावर बंदी घालण्याचे निर्देश दिल्या जात आहे आणि दुसरीकडे नागपूर तसेच अन्य शहरांना, ग्रामीण भारताला वाऱ्यावर सोडले जात आहे. राजधानीतील श्रीमंत वर्गाच्या जीवनशैलीमुळे गरीब जनता मरणाच्या दारात उभी असल्याचे सुतोवाच खुद्द सुप्रीम कोर्टाला करावे लागत आहे. यावरून सरकारसाठी फक्त राजधानी महत्त्वाची असून शेष भारत त्यांनी दुर्लक्षित केला, असेच म्हणावेसे वाटते. मागे मुंबई उच्च न्यायालयाने मुंबई महापालिका तसेच प्रदूषण नियामक मंडळाला धारेवर धरत वायू प्रदूषण प्रकरणी जागे होण्याचा सल्ला दिला होता. यावरून देशात प्रदूषणाचा प्रश्न किती ज्वलंत असल्याचे दिसून येत आहे. जिथे जनतेचा आवाज कुणीच ऐकत नाही, तिथे खुद्द न्यायालयाला दखल घ्यावी लागते आहे.

डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात तर उत्तर प्रदेशात इतके प्रदूषण वाढले होते की धुक्याने त्रासून कानपूर सारख्या भागात लोकांना श्वसनाचा त्रास जाणवायला लागला होता. परिणामी हृदय तपासणी करण्यासाठी अनेक सरकारी रुग्णालयांत एकच गर्दी उसळली होती.

एका माहितीनुसार देशात दरवर्षी २० लाख लोकांचा मृत्यू हा, हवा प्रदूषणाने होतो. आरोग्यतज्ञ ल्यूक क्रिस्टोफर यांनी सर्वोच्च न्यायालयात दिलेल्या माहितीनुसार या प्रदूषणामुळे दिल्लीतील तब्बल २२ लाख मुलांच्या फुस्फुसात बिघाड झाल्याचे म्हटले होते . यावरून देशातील अन्य भागात प्रदूषणाचा प्रश्न किती गंभीर असावा, याची जाणीव व्हायला लागते.

न्यायालय म्हणेल तेव्हाच त्यावर उपाययोजना केल्या जातील, असेच चित्र राहिल्यास येत्या काळात जन्माला येणारी नवी पिढी सुद्धा जन्मजात श्वसनाचे विकार घेऊन जन्माला येतील, यात मुळीच शंका नाही. जनतेचा टाहो ऐकू न येणाऱ्या शासनाच्या कानाच्या पडद्यापर्यंत निदान न्यायालयाचे खडे बोल तरी ऐकू जावे आणि निदान आतातरी यावर योग्य पाऊल उचलून उपाययोजना कराव्या, इतकेच.

**लीलाधर दवंडे**
कामठी (नागपूर)
८४१२८७७२२०

# कभी हां, कभी ना...

ट्रम्प स्वतःला जगाचे शासक समजू लागलेत. त्यामुळे गोर यांचा भारत दौरा असो की आंतरराष्ट्रीय व्यासपीठ असो, भारताला धडा शिकवण्याचा ट्रम्प यांचा निर्धार आहे. पण, ट्रम्प असो वा कुणीही असो भारत कुणासमोरही झुकणार नाही.

ट्रम्प यांनी भारतासह काही देशांवर ५०० टक्के टॅरिफ लावण्याची धमकी दिली. याचे कारण भारत रशियाकडून तेल खरेदी करत आहे. याचा राग ट्रम्प यांनी भारतावर आणि ब्राझीलसारख्या काही देशांवर काढला. ट्रम्प यांच्या या संतापाचा सर्वात गंभीर परिणाम भारत, चीन आणि ब्राझील या देशांना बसणार. त्यासाठी गोर जेव्हा भारत दौऱ्यावर आले तेव्हा त्यांनी भारतावर 'सँक्शनिंग ऑफ रशिया' कायद्याला पाठिंबा देण्यासाठी भारतावर दबाव आणला नाही, पण त्यांचा हेतू आणि बोलण्याचा मथितार्थ तोच होता. ट्रम्प यांचा भारतावर ५०० टक्के टॅरिफ लावण्याचा कट असंयुक्तिक तर आहेच, पण लहरीपणाचे द्योतक आहे. ट्रम्प स्वतःला जगाचे शासक समजू लागलेत. त्यामुळे गोर यांचा भारत दौरा असो की आंतरराष्ट्रीय व्यासपीठ असो. भारताला धडा शिकवण्याचा ट्रम्प यांचा निर्धार आहे. पण, ट्रम्प असो वा कुणीही असो भारत कुणासमोरही झुकला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारखा तगड्या नेत्याच्या हातात भारताची सूत्रे आहेत. त्यामुळे मोदी यांचा भारत-अमेरिकेच्या या दंडेलशाहीपुढे झुकणार नाही हे स्पष्ट आहे. हेच गोर यांच्या दौऱ्यानंतरही भारताने दाखवून दिले. ट्रम्प यांच्या या दंडेलशाहीचे कारण स्पष्ट आहे.

ट्रम्प यांना रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध थांबवण्याचे श्रेय हवे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातीलही युद्ध संपवण्याचे श्रेय घेण्याचा त्यांनी अनेकदा प्रयत्न केला, पण भारताने त्यांच्या या बनवेगिरीला भीक घातली नाही. आता गोर यांच्या दौऱ्याच्या निमित्ताने भारतावर आणखी एक दबाव आणण्याचा प्रयत्न ट्रम्प यांनी केला. पण गोर यांचा हा प्रयत्न भारताच्या ठाम नकारामुळे हाणून पाडला. जगभरातील युद्धे रोखून शांतता पुरस्कार मिळवण्याची ट्रम्प यांची धडपड अव्याहत सुरू आहे, पण तिला यश येत नाही. म्हणून ट्रम्प या पद्धतीने उत्तर देण्याचा प्रयत्न करत आहे. गोर यांचा दौरा कितपत यशस्वी झाला, ही बाब अलाहिदा. पण ट्रम्प यांनी असा विचार केला पाहिजे, की ५०० टक्के टॅरिफ लावला तर भारत आणि चीनमधून आयात केल्या जाणाऱ्या वस्तू अमेरिकेत प्रचंड महाग होतील. अमेरिकेत यादवी युद्ध होईल आणि अमेरिकन नागरिक ट्रम्प प्रशासनाविरुद्ध युद्ध सुरू करतील. तसेही अमेरिकेत कामगारांचे वेतन महाग असल्याने तेथे उत्पादन खूप महाग पडते. या प्रकारे टॅरिफ वाढवल्याने अमेरिकन नागरिकांचा राग आपल्याच म्हणजे ट्रम्प यांच्याविरोधात उसळेल. तसेही ट्रम्प यांच्या मनमानी पद्धतीने टॅरिफ लावण्याच्या या प्रकाराला अमेरिकन कनिष्ठ न्यायालयाने आधीच ठोकरून लावले. भारत-अमेरिका व्यापारविषयक बोलणी अद्याप पूर्ण झालेली नाहीत. मोदी यांना अत्यंत विचाराने आणि आर्थिक आणि राजनैतिक पैलूंचा सर्व प्रकारे विचार करून निर्णय घेतला पाहिजे. मोदी सरकारने सध्या आर्थिक स्थैर्य यांचा विचार करून निर्णय घ्यायला हवा. ट्रम्प यांच्या धमकीपुढे घाबरून जाऊ नये. ट्रम्प यांच्या टॅरिफच्या तोडीसतोड म्हणून भारताने ब्रिक्स आणि ट्रम्प यांच्या टॅरिफने असेच जे पोळलेले देश आहेत त्यांच्याबरोबर येऊन काम केले. ट्रम्प जेव्हा म्हणतात, की सत्तेमुळे माझ्या नैतिकतेला चाप लावला आहे, तेव्हा समजून जा; की ट्रम्प यांचे हे विधान म्हणजे ढोंगीपणाचे द्योतक आहे. पण त्याविरोधात कारवाई करताना ट्रम्प यांच्या आततायी विधानांकडे लक्ष न देता भारताने आपले वास्तव पाहिले पाहिजे. दोन्ही सेन्सेक्स आणि निफ्टी याच आठवड्यात २.५ टक्क्यांनी कोसळले. परदेशी गुंतवणूकदारांनी १.३ अब्ज डॉलरची गुंतवणूक देशातून बाहेर काढून नेली. रुपया कोसळून ९०.१६च्या वर उतरला आणि यात जागतिक अनिश्चित वातावरण भर टाकत आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यात युद्ध संपुष्टात येण्याची चिन्हे नाहीत आणि इराण आणि व्हेनेझुएलाने आंतरराष्ट्रीय अस्थिर परिस्थितीत आपल्या परीने भर टाकली. पण ट्रम्प यांनी धमकी दिली असली तरी भारतासमोर काही पर्याय आहेत. त्यापैकी एक आहे तो म्हणजे निर्यात बाजारपेठेत विविधता आणणे. त्यासोबत मेक्सिको, चीन आणि ब्रिक्स देशांबरोबर भारताने व्यापार वाढवण्याची तयारी सुरू केली पाहिजे. त्याद्वारेच भारत ट्रम्प यांच्या दादागिरीला उत्तर देऊ शकतो. भारताचा ब्रिटनबरोबर मुक्त व्यापार करार झाला. तेव्हापासूनच ट्रम्प यांचा पारा चढला आणि भारताला कसा धडा शिकवू असे त्यांना झाले. ट्रम्प यांनी टॅरिफ भरमसाट प्रमाणात लावण्यासाठी जी धमकी दिली, त्यात आणखी एक आव्हान आहे. ते म्हणजे नवीन बाजारपेठा मिळवण्याचा खर्च.

पण तातडीचा उपाय हाच आहे, की ट्रम्प यांच्या दादागिरीला भारताने जशास तसे उत्तर दिले पाहिजे. त्यासाठी भारताने ब्रिक्स देशांशी व्यापक समझोते केले पाहिजेत आणि भारत आणि इंग्लंडच्या धर्तीवर ब्रिक्स देशांशीही तशाच पद्धतीने करार केल्यास ट्रम्प यांचे नाक आपोआप दाबले जाईल. भारताने नुकतीच अमेरिकन ट्रेझरी बाँडमधील आपली गुंतवणूक झपाट्याने कमी केली. यामुळे ट्रम्प यांच्या नाकातोंडात पाणी गेले. हा धक्का ट्रम्प आणि डॉलरसाठी प्रचंड मानला जातो. भारताने गुंतवणुकीचे अन्य पर्याय शोधलेत. एका आकडेवारीनुसार भारताने ३१ ऑक्टोबर २०२४ ते ३१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान अमेरिकन गुंतवणूक तब्बल २१ टक्क्यांनी कमी केली. आता टॅरिफनंतर ही गुंतवणूक झपाट्याने कमी होत आहे. गोर यांच्या दौऱ्याचा काही उपयोग झाला नाही. उलट भारताचा ट्रम्प यांच्या दादागिरीपुढे न झुकण्याचा निर्धार वाढला. दुसरा धक्का भारताने काही देशांसोबत रुपयांमध्ये व्यवहार सुरू केले आणि हाही ट्रम्प यांना धक्का मानला जातो. सिल्व्हर लायनिंग अशी, की भारताची अर्थव्यवस्था आणखी मजबूत आहे. हे मत भारतीयाचे नाही; न्यूयॉर्क टाइम्सने हे वृत्त प्रसिद्ध केले. अमेरिकेतच ट्रम्प यांच्या टॅरिफच्या निर्णयाला कसा विरोध होत आहे हे समजून येते. गोर यांच्या दौऱ्याचा उपयोग भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार युद्ध कमी करण्याच्या दृष्टीने तर झाला नाही. पण अमेरिका हे समजून जाईल, की भारताला आता दादागिरीने नमवणे शक्य नाही. येथे नरेंद्र मोदी यांचे सरकार आहे हे त्यानी लक्षात घेतले तरी पुरे.

# भारताचे 'बाहुबली' यश

नुकतेच 'इस्रो'चे प्रचंड क्षमतेचे 'बाहुबली' रॉकेट प्रक्षेपित करून देशाने आत्मनिर्भरतेच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले. या प्रक्षेपणाचा लाभ अनेक क्षेत्रांना होणार असून 'डायरेक्ट-टू-स्मार्टफोन' ही नवी तंत्रज्ञान प्रणाली कार्यान्वित झाल्यामुळे देश प्रगतिपथावरून वेगाने वाटचाल करू शकणार आहे. शिक्षण, आरोग्य, शेती, व्यापार आदी क्षेत्रांना विनाखंडित इंटरनेट मिळण्याचे अनेक लाभ बघायला मिळतील.

भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच 'इस्रो'ने पुन्हा एकदा जागतिक स्तरावर कर्तृत्वाचा झेंडा फडकावला. २४ डिसेंबर २०२५ रोजी श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून एलव्हीएम ३-एम ६ या भारताच्या सर्वात शक्तिशाली रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले. प्रचंड क्षमतेमुळे या रॉकेटला 'बाहुबली' असे टोपणनाव देण्यात आले. हे केवळ एक रॉकेट प्रक्षेपण नव्हे, तर अंतराळ क्षेत्रातील भारताच्या वाढत्या व्यावसायिक ताकदीचे आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेचे एक जिवंत प्रतीक आहे. या मोहिमेद्वारे अमेरिकेचा 'ब्लू बर्ड ब्लॉक-२' हा महाकाय उपग्रह अवकाशात स्थापित करण्यात आला असून त्याचा थेट परिणाम आगामी काळात आपल्या मोबाईल वापरावर होणार आहे. या प्रक्षेपणाचा सर्वात मोठा आणि थेट फायदा सामान्य मोबाईल वापरकर्त्यांना मिळणार आहे. सध्या मोबाईलवर इंटरनेट वापरण्यासाठी आपण जमिनीवरील टॉवर्सवर अवलंबून असतो. मात्र, ब्लू बर्ड ब्लॉक-२ उपग्रहाच्या यशस्वी प्रक्षेपणामुळे 'डायरेक्ट-टू-स्मार्टफोन' ही नवी तंत्रज्ञान प्रणाली कार्यान्वित होणार आहे. यामुळे सामान्य ४ जी आणि ५ जी स्मार्टफोन्सना कोणत्याही विशेष उपकरणाशिवाय थेट अंतराळातून कनेक्टिव्हिटी मिळेल. यामुळे दुर्गम डोंगरदऱ्या, समुद्र किंवा मोबाईल टॉवर्स लावणे अशक्य असणाऱ्या ठिकाणीही आता हाय-स्पीड ब्रॉडबँड इंटरनेट उपलब्ध होईल. जगातील 'डिजिटल दरी' कमी होण्यास मदत होईल आणि ग्रामीण भागातील नागरिकही जागतिक माहिती तंत्रज्ञानाशी जोडले जातील. एलव्हीएम ३-एम ६ ने अवकाशात सोडलेला ब्लू बर्ड ब्लॉक-२ हा उपग्रह एका फिरत्या 'मोबाईल टॉवर'सारखा काम करतो. सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे याचा २२३ चौमीचा विशाल अँटेना. इतका मोठा असल्यामुळेच तो पृथ्वीपासून ५०० ते ६०० किलोमीटर उंचीवरून तुमच्या खिशातील लहानशा मोबाईलमधील कमकुवत सिग्नल पकडून प्रतिसाद देऊ शकतो. पारंपरिक सॅटेलाइट इंटरनेटसाठी घराच्या छतावर एक विशेष 'डिश' लावावी लागते; परंतु या तंत्रज्ञानात उपग्रह थेट फोनमधील एलटीई ५जी लहरींशी संवाद साधतो. या मोहिमेचा सर्वात मोठा आणि थेट फायदा व्होडाफोन आयडियाच्या वापरकर्त्यांना मिळण्याची शक्यता आहे.

बीएसएनएल विशेषतः आपत्कालीन सेवा, लष्करी गरजा आणि अतिदुर्गम भागातील नागरिकांसाठी सॅटेलाइट मेसेजग आणि कॉल सेवा सुरू करण्यावर भर देत आहे. रिलायन्स जिओ आणि भारती एअरटेल सध्या 'स्टारलक' आणि 'वनवेब' यांसारख्या सेवांशी स्पर्धा किंवा सहकार्य करण्याच्या तयारीत आहेत. मात्र या सेवा सुरुवातीला 'फिक्स्ड वायरलेस अॅक्सेस' यावर केंद्रित असू शकतात. भविष्यात फोनच्या 'नेटवर्क सेटग्स'मध्ये 'सॅटेलाइट रोमग' असा पर्याय दिसू शकेल. तो सुरू केल्यानंतर तुम्ही टॉवरच्या कक्षेबाहेर गेल्यावरही फोन सुरू राहील. ही सेवा प्रामुख्याने समुद्रात मासेमारीसाठी जाणारे कोळी, हिमालयात जाणारे ट्रेकर्स, जंगलातील रिसॉर्टस आणि राष्ट्रीय महामार्गावरील सिग्नल नसणाऱ्या जागांवरून प्रवास करणाऱ्या लोकांसाठी वरदान ठरेल. या तंत्रज्ञानाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे वापरकर्त्याला काहीही नवीन खरेदी करण्याची गरज नाही. म्हणजेच सॅटेलाइट फोन किंवा 'स्टारलक'सारख्या छतावर बसवण्याच्या अँटेनाची गरज भासणार नाही. सध्याचा ४जी/५जी एलटीई तंत्रज्ञान असणारा स्मार्टफोनच उपग्रहाशी जोडला जाईल. या तंत्रज्ञानामुळे मोबाईल टॉवरची रेंज नसणाऱ्या ठिकाणी तुमचा फोन आपोआप उपलब्ध उपग्रह सिग्नल शोधेल. हे तंत्रज्ञान 'रोमग'प्रमाणेच काम करेल. या सेवेअंतर्गत सुरुवातीच्या टप्प्यात वापरकर्ते आपत्कालीन एसएमएस, साधे मेसेज आणि व्हॉईस कॉल करू शकतील. लवकरच टेलिकॉम कंपन्या ग्राहकांसाठी 'सॅटेलाइट ऑन डिमांड' प्लॅन्स आणू शकतात. उदाहरणार्थ, तुम्ही हिमालयात ट्रेकला जाणार असाल तर काही दिवसांसाठी सॅटेलाइट कनेक्टिव्हिटीचा पॅक घेऊ शकाल. या प्रक्षेपणामुळे देशाच्या कानाकोपऱ्यात हाय-स्पीड इंटरनेट पोहोचेल. शिक्षण आणि आरोग्यासाठी त्याचा फायदा होईल. चक्रीवादळ, पूर आल्यावर जमिनीवरील टॉवर्स कोसळले तरी उपग्रहाद्वारे मिळणारे नेटवर्क बचावकार्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरेल. ग्रामीण भागातील शेतकरी आणि छोटे व्यावसायिक उपग्रहाद्वारे इंटरनेटशी जोडले गेल्यामुळे थेट बाजारपेठेशी संपर्क साधू शकतील. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

दुसरी बाब म्हणजे आजही ग्रामीण भागातील दुकानांमध्ये नेटवर्क नसल्यास यूपीआय व्यवहार फेल होतात. मात्र 'बाहुबली' उपग्रहामुळे मिळणाऱ्या स्थिर नेटवर्कमुळे अगदी दुर्गम भागातील किराणा दुकानातही डिजिटल पेमेंट सहज शक्य होईल. फळे, भाजीपाला, औषधे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेताना ट्रकच्या ट्रॅकसाठी नेटवर्क आवश्यक असते. मात्र महामार्गावरील 'ब्लॅक स्पॉट'मुळे यात अडचण येते. आता ही अडचणही सुटणार असून रिअल-टाइम ट्रॅकग शक्य होईल. सध्या खेड्यापाड्यातील बरीच मुले यूट्यूब किंवा इतर शैक्षणिक अॅप्सवरून अभ्यास करतात. पण पावसाळ्यात, खराब हवामानात फायबर तुटल्यास यात खंड पडतो. सॅटेलाइट इंटरनेटमुळेही अडचणही दूर होणार आहे. आणखी एक बाब म्हणजे छोट्या शहरांमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांची नेहमीच कमतरता असते

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

## महत्त्वाचे...



### इराणमधील परिस्थिती बिघडली, भारतीयांना तत्काळ बाहेर पडण्याचा सल्ला

इराणमध्ये हिंसक निदर्शनांमुळे भारत सरकारने बुधवारी नागरिकांसाठी एक सल्लागार सूचना (ॲडव्हायझरी) जारी केली आहे. यात म्हटले आहे की, जे भारतीय नागरिक, मग ते विद्यार्थी असोत, तीर्थयात्री असोत, व्यापारी असोत किंवा पर्यटक असोत, सध्या इराणमध्ये आहेत, त्यांनी शक्य तितक्या लवकर तेथून बाहेर पडावे.या सल्लागार सूचनेत म्हटले आहे की, हा सल्ला 5 जानेवारीच्या मागील सल्लागार सूचनेचा पुढील भाग आहे आणि इराणमधील बदलत्या परिस्थिती लक्षात घेऊन देण्यात आला आहे.सरकारने हे देखील पुन्हा सांगितले आहे की, सर्व भारतीय नागरिकांनी सावधगिरी बाळगावी. त्यांनी निदर्शने किंवा गर्दीच्या ठिकाणांपासून दूर राहावे.इराणमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांनी भारतीय दूतावासाच्या संपर्कात राहावे आणि स्थानिक माध्यमांवर लक्ष ठेवावे जेणेकरून कोणत्याही नवीन माहितीची त्यांना जाणीव होईल.इराणमध्ये बुधवारी संध्याकाळी 300 मृतदेहांना दफन केले जाईल. इंग्रजी वृत्तपत्र द गार्डियननुसार, मृतदेहांमध्ये आंदोलकांसह सुरक्षा दलांचे मृतदेह देखील असतील. हा कार्यक्रम कडेकोट बंदोबस्तात तेहराण विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये होऊ शकतो.

### मुख्याध्यापकाकडून अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार



कोल्हापूर जिल्ह्यात शिक्षण क्षेत्राला काळिमा फासणारी एक अत्यंत संतापजनक आणि धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका आश्रम शाळेच्या मुख्याध्यापकानेच अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. गुरु-शिष्याच्या पवित्र नात्याला तडा देणाऱ्या या पाशवी कृत्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात संतापाची लाट उसळली असून, या घटनेने शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ उडवून दिली आहे. ज्ञानाचे मंदिर मानल्या जाणाऱ्या शाळेतच घडलेल्या या संतापजनक प्रकारामुळे पालक वर्गात तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे.या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत कोल्हापूरच्या जुना राजवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पीडित मुलगी आणि तिच्या आईने पोलिस अधीक्षक योगेश कुमार यांची भेट घेतल्यानंतर महिला सहाय्य कक्षात त्यांचा सविस्तर जबाब नोंदवण्यात आला आहे. ऑगस्ट ते ऑक्टोबर 2025 दरम्यान दोन वेळा लैंगिक अत्याचार झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले असून, पोलिसांनी याप्रकरणी संशयित मुख्याध्यापक कृष्णा दाभोळे याला तातडीने अटक केली. आरोपीला न्यायालयात हजर केले असता त्याला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली असून, शहर पोलिस उपअधीक्षक प्रिया पाटील या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# 'मातृभूमी 'चा दीक्षांत समारंभ पदवीच्या ज्ञानाला विवेकाची जोड हवी-धनंजय गुडसूरकर

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

उदगीर - पदवी म्हणजे मिळालेल्या ज्ञानाचे प्रमाणपत्र असते, या ज्ञानाला विवेकाची जोड मिळाली तर ते ज्ञान व पदवी सार्थकी लागते असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक व उदगीरच्या मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष धनंजय गुडसूरकर यांनी केले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ संलग्नित मातृभूमी महाविद्यालयाचा दीक्षांत समारंभ प्रसंगी बोलत होते .

समारंभाच्या अध्यक्षस्थानी मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष सतीश उस्तुरे होते तर प्रमुख पाहुणे न्या. डी. बी. मल्हाटकर, तहसीलदार राम बोरगावकर स्वारातीम विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक प्रा. मारोतीराव गायकवाड, प्राचार्य उषा कुलकर्णी यांची उपस्थिती होती यावेळी मातृभूमी महाविद्यालयाच्या बीसीए बीसीएस च्या विद्यार्थ्यांना पदवी वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले .

यावेळी पुढे बोलताना धनंजय गुडसूरकर म्हणाले, "साहित्यिक म्हणून मी जेव्हा तुमच्याकडे पाहतो, तेव्हा मला तुमच्यात उद्याचे नायक आणि नायिका दिसतात. आयुष्य हे एका महाकाव्यासारखे आहे. इथपर्यंतचा प्रवास हा `पूर्वार्ध` होता, आणि आता खऱ्या `उत्तरार्धा`ला सुरुवात होत आहे. तुमच्या आयुष्याची लेखणी तुमच्या स्वतःच्या हातात आहे. अपयशाची एखादी ओळ आली तरी घाबरून जाऊ नका, कारण तो तुमच्या संघर्षाचा एक भाग असेल. समाजात




वावरताना इतरांच्या दुःखाचे शब्द व्हा, वंचितांचा आवाज व्हा. साहित्य आपल्याला हेच शिकवते की, दुसऱ्याच्या डोळ्यांतील पाणी पुसता येणे हेच सर्वात मोठे शिक्षण आहे.

यावेळी प्राचार्य उषा कुलकर्णी म्हणाल्या" गेली काही वर्षे तुम्ही या मातृभूमीमधुन बाहेर पडताना केवळ एक `डिग्री` घेऊन जात नाही आहात, तर या समाजाचे ऋण फेडण्याची जबाबदारी घेऊन जात आहात. यावेळी बोलताना न्या. म्हलाटकर म्हणाले " मातृभूमी महाविद्यालयात संगणक विषयातील पदवी शिक्षणासाठी ग्रामीण भागासह शहर भागातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात शिक्षण घेत असतात . आज सायबर गुन्ह्यात वाढ होत आहे . त्यामुळे संगणक शिक्षणचा उपयोग सायबर गुन्हे कमी करण्यासाठी करावे. समाजात वावरताना तुम्ही कोणत्या क्षेत्रात जाता यापेक्षा तुम्ही तिथे कसे वागता, याला अधिक महत्त्व आहे. कायदा केवळ न्यायालयात नसतो, तर तो आपल्या वर्तणुकीत आणि शिस्तीत असतो. तुम्ही उद्याचे वकील, अधिकारी, डॉक्टर किंवा उद्योजक व्हाल, पण त्याआधी एक `न्यायप्रिय` नागरिक व्हा. तहसीलदार राम बोरगावकर म्हणाले, पदवीधरांना एवढेच सांगेन की, तंत्रज्ञान बदलेल, जग बदलेल, पण तुमची मानवी मूल्ये कधीही बदलू देऊ नका. समाजासाठी, देशासाठी आणि स्वतःच्या प्रगतीसाठी सदैव तत्पर राहा. प्रा डॉ मारोती गायकवाड म्हणाले बाहेरचे जग एका विशाल न्यायालयासारखे आहे,

## 'तो' जीवाच्या आकांतानं धावला, पण टोळक्यानं गाठलंच; पोलीस ठाण्यासमोरच कार्यकर्त्यावर

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

पुणे: पुण्यातील दौंड शहरात कायद्याचा धाक संपल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाच्या एका पदाधिकाऱ्यावर शहरातील मुख्य चौकात धारदार शस्त्र घेऊन जीवघेणा हल्ला करण्यात आला. विशेष म्हणजे, हा पाठलाग थेट पोलीस ठाण्यापर्यंत झाला आणि पोलीस ठाण्याच्या समोरच त्या कार्यकर्त्याला रस्त्यावर पाडून अमानुष मारहाण करण्यात आली.

नगरपालिका निवडणुकीत उमेदवार राहिलेले आणि पक्षाच्या सोशल मीडिया विभागाचे शहराध्यक्ष आफताब जुनेद सय्यद यांच्यावर १२ जानेवारी रोजी दुपारी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात काही जणांनी कोयता उगारून हल्ला करण्याचा प्रयत्न केला. प्रसंगावधान राखत त्यांनी वार चुकवला आणि जीव वाचवण्यासाठी पोलीस ठाण्याच्या दिशेने धाव घेतली. मात्र हल्लेखोरांनी त्यांचा पाठलाग करत संविधान चौकात, पोलीस ठाण्याच्या अगदी समोर त्यांना गाठले. धावतानाच उतारावर तोल गेल्याने आफताब खाली पडले आणि जमावाने त्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

या घटनेदरम्यान परिसरात प्रचंड गर्दी जमली होती, वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. तरीही जवळच असलेल्या पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप न केल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. हल्लेखोर हातात कोयते घेऊन पोलीस ठाण्याच्या आवारात आले असतानाही त्यांच्यावर त्वरित कारवाई न झाल्याचे चित्र आहे.

परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये हा संपूर्ण प्रकार कैद झालेला असतानाही "कोणी तक्रार दिलेली नाही" असे सांगून पोलिसांनी गुन्हा नोंदवला नसल्या[illegible]तले जात आहे. [illegible]च्या चौकात शस्त्र उगारून दहशत निर्माण होत असताना पोलिस प्रशासनाने बघ्याची भूमिका घेतल्याचा आरोप होत आहे. या घटनेमुळे दौंड शहरातील कायदा सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, खाकीचा दरारा केवळ कागदावरच उरला आहे का, असा सवाल नागरिक करत आहेत.



## परप्रांतीयांना मारणे हा मराठी माणसांचा विकास नाही:मुख्यमंत्र्यांचा ठाकरे बंधूंना टोला

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी मुंबईत महायुतीचा विजय निश्चित असल्याचा पुनरुच्चार केला. महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर महाराष्ट्र हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याच मागे उभा असल्याचे अधोरेखित होईल. विशेषतः भाजप सर्वात मोठा पक्ष ठरेल, महायुतीच येथे राज्य करेल व मोदींच्या नेतृत्वात मिळालेल्या या विजयातून महाराष्ट्र कुणासोबत आहे हे ही स्पष्ट होईल, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी परप्रांतीयाना मारहाण करणे म्हणजे मराठी माणसांचा विकास नसल्याचा टोलाही ठाकरे बंधूंना हाणला.

मुंबई महापालिकेसह राज्यातील 29 महापालिकांसाठी उद्या मतदान होणार आहे. तत्पूर्वी, आज वृत्तसंस्थेशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे बंधूंवर सडकून टीका केली. ते म्हणाले, विरोधकांनी (ठाकरे बंधू) मराठी विरुद्ध अमराठी




अशी निवडणूक करण्याचा खूप प्रयत्न केला. पण मराठी माणूस एवढा संकुचित नाही. महाराष्ट्रात आमची प्रादेशिक अस्मिता आहे. मराठी आमची भाषा आहे. त्या भाषेचा आम्हाला अभिमान आहे. त्या भाषेचा विकास व कल्याण झाले पाहिजे. मराठी माणूस हा महाराष्ट्रात सुरक्षित असला पाहिजे. त्याचा विकास झाला पाहिजे. यावर दुमत असता कामा नये.पण मराठी माणसाचा विकास म्हणजे काय? मराठी माणसावर मागील 25 वर्षांत मुंबईतून पलायन करण्याची वेळ आली. आणि तुम्ही तिकडे केवळ वल्गना केल्या, हा मराठी माणसाचा विकास नाही. एखाद्या परप्रांतीय ऑटो चालकाला 2 थापडा मारणे हा ही मराठी माणसाचा विकास नाही.ते म्हणाले, आम्ही 40 हजार मराठी माणसांना बीडीडी चाळीत हक्काचे घर देऊन दाखवले. अभ्यूदय नगर असेल, पत्राचाळ असेल, विशाल सह्याद्री असेल, मोतीलाल नगर आदी भागातील मराठी माणूस कदाचित वसई-विरारपेक्षा जास्त लांब राहण्यासाठी गेला असता. त्याला त्याच ठिकाणी घरे देण्याचे काम आम्ही केले. हे मराठी माणसांसाठी केलेले काम आहे. त्यामुळे आज या एकाच कारणाने मराठी माणूसही विरोधकांसोबत नाही व अमराठीही त्यांच्यासोबत नाही. मराठी माणसाला ग्रहित धरून त्यांनी केलेला प्रयत्न पूर्णतः अपयशी ठरला आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी तामिळनाडूचे भाजप नेते अन्नामलाई यांच्या मुंबईवरील विधानावरून निर्माण झालेल्या वादावरही भाष्य केले.

## 'ती' नोट दाखवा अन् पैसे न्या! खासदार पुत्रावर पैसे वाटपाचा गंभीर आरोप

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

श्रीकृष्ण पांचाळ, पिंपरी-चिंचवड: पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेची निवडणूक राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासाठी अत्यंत प्रतिष्ठेची मानली जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २४ मध्ये शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांचे सुपुत्र विश्वजीत श्रीरंग बारणे, तसेच त्यांचा पुतण्या आणि भाची निवडणूक रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे या प्रभागात खासदार श्रीरंग बारणे यांची राजकीय प्रतिष्ठा पणाला लागली आहे.दरम्यान, विश्वजीत बारणे यांनी मतदारांना पैसे वाटल्याचा गंभीर आरोप भाजप पुरस्कृत उमेदवार गणेश गुजर आणि



करिष्मा बारणे यांनी केला आहे. या आरोपांमुळे पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून, राज्यात युती असलेल्या शिवसेना आणि भाजप या दोन्ही पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या जोरदार फैरी झडत आहेत.भाजप पुरस्कृत उमेदवारांनी आरोप केला आहे की, विश्वजीत बारणे यांच्या समर्थकांकडून दडपशाही केली जात असून थेरगाव परिसरात मोठ्या प्रमाणावर पैशांचे वाटप सुरू आहे. वडील खासदार असल्यामुळे शासकीय आणि प्रशासकीय यंत्रणा त्यांना सहकार्य करत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. या प्रकरणी निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आल्याची माहिती उमेदवारांनी दिली.प्रभाग क्रमांक २४ मध्ये साम, दाम, दंड, भेद या सर्व मार्गांचा अवलंब करून निवडणूक लढवली जात असल्याचा आरोप करत, लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम प्रशासकीय अधिकारी करत असल्याचा दावाही भाजप पुरस्कृत उमेदवारांनी केला आहे.

## पत्नीची लेकीच्या ताब्यासाठी मागणी, तो संतापला अन् घरातच आठ वर्षांच्या लेकीला संपवलं, नागपूर हळहळलं

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

नागपूर: नागपूरच्या वाठोडा परिसरातून एक हृदयद्रावक आणि समाजाला हादरवून टाकणारी घटना समोर आली आहे. पत्नीशी सुरू असलेल्या कौटुंबिक वादातून एका पित्याने आपल्या आठ वर्षांच्या चिमुकल्या मुलीची चाकूने निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवारी (14 जानेवारी) पहाटे घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात संताप आणि हळहळ व्यक्त होत असून, वाठोडा पोलिसांनी आरोपी पित्याला अटक केली आहे.ही घटना वाठोडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सरोदेनगर परिसरातील



प्लॉट क्रमांक 12 येथे बुधवारी पहाटे साडेपाचच्या सुमारास घडली. शेखर शेंदरे (वय 46) असे आरोपी पित्याचे नाव असून, धनश्री शेंदरे (वय 8) असे मृत चिमुकलीचे नाव आहे. धनश्री ही आजी कुसुमबाई आणि वडिलांसोबत राहत होती.मिळालेल्या माहितीनुसार, शेखर शेंदरे आणि त्याची पत्नी शुभांगी यांच्यात गेल्या अनेक वर्षांपासून वाद सुरू होता. पत्नी शुभांगी वेगळी राहत होती आणि मुलीचा ताबा (कस्टडी) आपल्याकडे देण्याची मागणी करत होती. मात्र, शेखर याला तीव्र विरोध करत होता. याच कारणावरून दोघांमध्ये सतत वाद होत असल्याचे सांगितले जाते. आरोपी दारूच्या आहारी गेला होता आणि पत्नीवर संशय घेत मारहाण करत असल्याचेही पोलिस तपासात पुढे आले आहे.

बुधवारी पहाटे आरोपी दारूच्या नशेत होता. याच दरम्यान धनश्रीने पाणी मागितले आणि आधीपासून मनात असलेल्या रागाच्या भरात शेखरने थेट चाकू उचलून मुलीच्या छातीत वार केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. रक्ताच्या थारोळ्यात पडलेली धनश्री मदतीसाठी रडत होती. तिच्या किंकाळ्या ऐकून आजी कुसुमबाई आणि काका उमेश घटनास्थळी धावले.

गंभीर जखमी अवस्थेत धनश्रीला तातडीने वाठोडा पोलिस ठाण्यात नेण्यात आले. पोलिसांनी कोणताही विलंब न करता तिला मेडिकल हॉस्पिटलमध्ये दाखल केले.

## लढाई मनपाची, मुद्दा नागरिकांचा:नेते मोठे झाले, पण संभाजीनगरकरांचा जगणं तिथंच थांबलंय...नळाजवळ, गटाराजवळ आणि अंधाऱ्या गल्लीत!

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

छत्रपती संभाजीनगर... हे शहर केवळ कागदावर स्मार्ट आहे. फलकांवर, भाषणांमध्ये, सरकारी कागदपत्रांमध्ये आणि जाहिरातीत ते झळकतं. पण जेव्हा आम्ही या शहराच्या गल्ल्यांत, वस्त्यांत, प्रभागांत पाय ठेवतो, तेव्हा प्रत्येक पावलागणिक एकच प्रश्न मनात घुमतो—हे खरंच आपलं शहर आहे का? आपण खरंच २१ व्या शतकात जगतोय का?

'लढाई मनपाची, मुद्दा नागरिकांचा' या टॉक शोसाठी आम्ही शहरातील अनेक प्रभाग पिंजून काढले. कुठेही मुद्दाम दोष शोधायला गेलो नाही. फक्त नागरिकांमध्ये उभे राहिलो, त्यांचं ऐकलं, त्यांच्या घरात शिरलो, त्यांच्या नळातून येणारं पाणी पाहिलं, त्यांच्यासोबत रस्त्यांवरून चाललो. तेव्हा जाणवलं, या केवळ समस्या नाहीत, ही माणसांच्या जगण्यावरची थेट ओरखडे आहेत.

महापालिकेच्या इमारतीपासून अवघ्या हाकेच्या अंतरावर असलेला प्रभाग क्रमांक ५. नावाला शहराचं हृदय. पण वास्तव मात्र अंगावर काटा आणणारं. अरुंद गल्ली, उघडे नाले, दुर्गंधी आणि नळ उघडताच आधी गटाराचं पाणी. इथे राहणाऱ्या लोकांना जिवंतपणी नरकयातना काय असतात, हे रोज अनुभवावं लागतं. आणि हा अनुभव फक्त या प्रभागापुरता मर्यादित नाही. शहरातील जवळपास प्रत्येक प्रभागात असा एखादा भाग आहे, जिथे विकास थांबलेला नाही, तर तो कधीच पोहोचलाच नाही.मराठवाडा स्वतंत्र होऊन ७७ वर्षे झाली. देश चंद्रावर पोहोचला. पण इथे निवडणूक आजही नळ, गटार, रस्ता आणि मीटर याच मुद्द्यांवर लढवली जाते. हा विकासाचा अभाव नाही, तर व्यवस्थेचा पराभव आहे. शहरात उघडे नाले, अस्वच्छता, अविकसित मैदाने, महिला असुरक्षितता, ड्रग्स, गुन्हेगारी—असं सगळं असताना राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू अजूनही पाण्यावरच अडकलेला आहे. कारण तेही लोकांना नीट मिळत नाही.

आम्ही काही वस्त्यांमध्ये गेलो, जिथे रुग्णवाहिका घरापर्यंत येऊ शकत नाही. रस्ता नाही, वळण नाही, जागा नाही. "रुग्णाला झोळीत टाकून मुख्य रस्त्यापर्यंत न्यायचं," असं नागरिक सांगत होते. काहींच्या डोळ्यांत पाणी होतं, कारण या प्रवासात काहींचे प्राण गेले होते. प्रश्न साधा होता—रस्ता नसणं ही चूक आहे की गुन्हा?

काही प्रभागांत आरोग्य केंद्रच नाही. सरकारी दवाखाना नाही. सार्वजनिक शौचालय आहे, पण ते नावापुरतं. दरवाजे



नाहीत, स्वच्छता नाही. आत कोणी गेलं, तर बाहेरून हात दिसतो, मी आत आहे हे सांगण्यासाठी. हे ऐकताना आपण गप्प होतो. कारण यावर बोलणंही अपमानास्पद वाटतं.

पाणी ही तर शहराची सर्वात मोठी जखम बनलेला प्रश्न. काही भागांत ५ दिवसांनी पाणी, काही ठिकाणी १०–१२ दिवसांनी, तर काही ठिकाणी २० दिवसांनी. आणि तेही कसं? नळ उघडताच आधी गटाराचं पाणी.

## आरोग्य

### 2 दिवसांतून एकदा शौचास होणं सुरक्षित? रोज पोट साफ न झाल्यास होतो आतड्यांचा कॅन्सर?



अनेकदा लोकांना वाटते की रोज सकाळी उठल्या उठल्या पोट साफ होणे म्हणजेच निरोगी आरोग्य, परंतु वैद्यकीय शास्त्रानुसार दिवसातून ३ वेळा किंवा आठवड्यातून किमान ३ वेळा पोट साफ होणे ही एक सामान्य प्रक्रिया मानली जाते. जर तुम्हाला शौचास बसल्यावर जास्त जोर लावावा लागत नसेल, पोटात वेदना होत नसतील, मलमूत्र मऊ आणि गुळगुळीत असेल आणि विसर्जनानंतर शरीराला हलकेपणा जाणवत असेल, तर तुमचे 'गट हेल्थ' उत्तम आहे असे समजावे.

पोटाच्या समस्या केवळ खाण्यापिण्यामुळेच नाही, तर तणाव, झोप आणि शारीरिक हालचालींच्या कमतरतेमुळेही उद्भवू शकतात. तुमच्या पचनसंस्थेचे आरोग्य नेमके कसे आहे, हे समजून घेण्यासाठी तज्ज्ञ 'ब्रिस्टल स्टूल चार्ट'चा वापर करतात. या चार्टमधील ७ प्रकारांवरून आपण बद्धकोष्ठता ते डायरियापर्यंतच्या स्थितीचा अंदाज लावू शकतो. पोटाचे आरोग्य नीट राखण्यासाठी केवळ फायबरच नाही, तर मानसिक शांती आणि योग्य हायड्रेशन देखील तितकेच आवश्यक आहे. या प्रक्रियेतील ५ मुख्य पैलू आपण खालीलप्रमाणे समजून घेऊया.

जर तुमच्या मलमूत्राचा नमुना ब्रिस्टल प्रकार १ किंवा २ सारखा असेल, तर तुम्ही बद्धकोष्ठतेने ग्रासलेले आहात. यामध्ये मलमूत्र अत्यंत कडक, कोरडे आणि गाठींसारखे असते. हे प्रामुख्याने आहारात फायबरची कमतरता, शरीरातील पाण्याची पातळी घटणे आणि आतड्यांची हालचाल मंदावणे यामुळे होते. अशा स्थितीत शौचास बसल्यावर जास्त जोर लावावा लागतो, ज्यामुळे भविष्यात मूळव्याधीसारखे आजार उद्भवू शकतात.

प्रकार ३ आणि ४ हे निरोगी पचनसंस्थेचे लक्षण मानले जातात. यामध्ये मलमूत्र स्मूथ, मऊ आणि सॉसेजच्या आकाराचे असते, जे विसर्जित करताना कोणताही त्रास किंवा वेदना होत नाहीत. हे सूचित करते की तुमच्या आहारात फायबरचे प्रमाण संतुलित आहे, तुम्ही पुरेसे पाणी पीत आहात आणि तुमची पचनसंस्था अन्नातील पोषक घटक योग्य प्रकारे शोषून घेत आहे. ही स्थिती टिकवून ठेवणे दीर्घायुष्यासाठी अत्यंत गरजेचे आहे. जर मलमूत्र खूप सैल, तुकड्यांमध्ये किंवा पूर्णपणे पाण्यासारखे असेल (प्रकार ५ ते ७), तर तुम्ही 'डायरिया झोन'मध्ये आहात. याची संभाव्य कारणे म्हणजे अन्नाची ॲलर्जी, शरीरातील संसर्ग, प्रचंड मानसिक तणाव किंवा अन्नातील पोषक तत्वांचे शोषण न होणे ही असू शकतात. सतत अशा प्रकारचे विसर्जन होत असल्यास शरीरातील पाणी आणि क्षारांचे प्रमाण कमी होऊन अशक्तपणा येऊ शकतो.

तुमची पचनसंस्था बिघडण्यामागे अनेक कारणे असू शकतात. अति-प्रक्रिया केलेले पदार्थ, मद्यपान, व्यायामाचा अभाव, सतत बसून राहण्याची सवय आणि औषधांचे दुष्परिणाम यामुळे पोटाच्या सवयी बदलतात. तसेच, दीर्घकालीन तणाव आणि चिंता यांचा थेट संबंध आपल्या आतड्यांशी असतो. कधीकधी अनुवंशिकता आणि हार्मोनल असंतुलन देखील मलमूत्र विसर्जनाच्या पॅटर्नमध्ये बदल घडवून आणू शकतात.

### लिव्हर कधीच होणार नाही खराब, दारू, सिगारेटने सडून खराब झालेलं लिव्हर होईल पुन्हा नवीन, फक्त खा हे 5 जादुई पदार्थ



लिव्हरमध्ये अतिरिक्त चरबी जमा होणे ही सुरुवातीला साधी वाटणारी स्थिती पुढे गंभीर स्वरूप धारण करू शकते. सुका मेवा हा निरोगी फॅट्स, फायबर आणि अँटीऑक्सिडंट्सचा उत्तम स्रोत आहे, जो लिव्हरमधील जळजळ कमी करण्यास मदत करतो. अक्रोड, बदाम आणि पिस्त्यासारखे ड्रायफ्रूट्स यकृताच्या पेशींचे संरक्षण करतात आणि 'ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस' कमी करतात.

सुक्या मेव्यासोबतच आपल्या स्वयंपाकघरातील हळद आणि लिंबू हे दोन घटक लिव्हरला डिटॉक्स करण्यासाठी औषधाप्रमाणे काम करतात. हळदीतील 'कर्क्युमिन' पेशींची दुरुस्ती करते, तर लिंबातील व्हिटॅमिन C विषारी घटक बाहेर टाकण्यास मदत करते. योग्य आहार आणि नियमित व्यायामाची जोड दिल्यास फॅटी लिव्हरची समस्या दूर करून यकृताचे आरोग्य पुन्हा मिळवता येते.

अक्रोडमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि दाहकविरोधी (Anti-inflammatory) गुणधर्म मुबलक असतात. हे घटक लिव्हरमधील एंझाइम सुधारण्यास आणि साठलेली चरबी कमी करण्यास मदत करतात. रात्री भिजवलेले अक्रोड सकाळी खाणे यकृतासाठी अधिक फायदेशीर ठरते.

बदाम हे व्हिटॅमिन ई, फायबर आणि निरोगी चरबीने समृद्ध असतात. ज्यामुळे लिव्हरमधील चरबी, चयापचय सुधारते आणि ऑक्सिडेटिव्ह ताण कमी होतो. दररोज बदामाचे सेवन केल्याने शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉल म्हणजेच LDL कोलेस्ट्रॉल कमी होते आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राहते. यामुळे लिव्हरवरील ताण कमी होऊन चरबी विरघळण्यास मदत होते. सकाळी नाश्त्यासोबत ५-६ भिजवलेले बदाम खाणे सर्वोत्तम आहे.

पिस्तामध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि हेल्दी फॅट अर्थात चांगली चरबी भरपूर प्रमाणात असतात. ते चरबी पचवण्यासाठी सहभागी असलेल्या शरीराच्या जनुकांना चांगले कार्य करण्यास आणि ऑक्सिडेटिव्ह नुकसान कमी करण्यास मदत करतात. संशोधनानुसार, पिस्ता खाल्ल्याने कोलेस्ट्रॉल नियंत्रित होण्यास आणि लिव्हरवरील चरबी कमी होण्यास मदत होते. तुम्ही व्यायामापूर्वी किंवा नंतर पिस्ता खाऊ शकता.पेकन नट्समध्ये हेल्दी चरबी, व्हिटॅमिन ई व अँटीऑक्सिडंट्स असतात. हे लिव्हरवरची सूज कमी करण्यास आणि लिव्हरच्या पेशींचे नुकसान होण्यापासून संरक्षण करण्यास मदत करतात. मधल्या वेळेतील स्नॅक्समध्ये त्यांचा समावेश केल्याने लिव्हरवर वाढलेली चरबी कमी होण्यास आणि चयापचय सुधारण्यास मदत होऊ शकते. दुपारच्या जेवणात सॅलडमध्ये पेकन नट्स खाऊ शकता किंवा सकाळी भूक लागल्यावर थोडेसे खाऊ शकता.

# हर्ष मेहतासोबत डेटिंगच्या बातम्यांवर मलायकाची प्रतिक्रिया

## म्हणाली - लोकांना बोलणे आवडते; एक्स अर्जुन कपूरला आयुष्याचा महत्त्वाचा भाग म्हटले

मलायका अरोराला गेल्या वर्षी डायमंड व्यावसायिक हर्ष मेहतासोबत पाहिले गेले होते, त्यानंतर तिच्या प्रेम जीवनाबद्दल अटकळी लावल्या जाऊ लागल्या होत्या. आता अभिनेत्रीने या अफवांवर प्रतिक्रिया दिली आहे. याशिवाय तिने तिचा एक्स बॉयफ्रेंड अभिनेता अर्जुन कपूरबद्दलही सांगितले आहे.

नम्रता झकारियाच्या शोमध्ये अर्जुनबद्दल बोलताना मलायकाने म्हटले, “तो माझ्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. काहीही झाले तरी तो माझ्या आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग राहिला आहे.



मला माझ्या भूतकाळाबद्दल किंवा भविष्याबद्दल जास्त बोलायचे नाही. याबद्दल आधीच खूप काही लिहिले आणि दाखवले गेले आहे. माझे वैयक्तिक आयुष्य माध्यमांसाठी चर्चेचा विषय बनले आहे."

जेव्हा होस्टने अर्जुनला ब्रेकअपनंतर हर्षबद्दल विचारले, तेव्हा मलायका म्हणाली- “लोकांना बोलणे आवडते. जर तुम्हाला कोणासोबत पाहिले गेले, तुम्ही बाहेर गेलात, तर तो चर्चेचा विषय बनतो. मला विनाकारण या गोष्टींना हवा द्यायची नाही. मला असे करायचे नाही, कारण त्याचा खरोखर काही फायदा होणार नाही.मलायका एनरिकच्या कॉन्सर्टदरम्यान हर्ष मेहतासोबत.

मलायका एनरिकच्या कॉन्सर्टदरम्यान हर्ष मेहतासोबत.विश्वास ठेवा, मी जेव्हाही बाहेर पडले आहे, मग तो जुना मित्र असो, गे मित्र असो, विवाहित मित्र असो, कोणताही जुना मित्र असो, मॅनेजर असो किंवा कोणीही असो...माझे नाव लगेच त्या व्यक्तीशी जोडले जाते. आम्ही यावर हसतो आणि विनोद करतो.”सांगायचे झाल्यास, गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये मुंबईत एनरिक इग्लेसियसच्या कॉन्सर्टमध्ये मलायकाला डायमंड व्यावसायिक हर्ष मेहतासोबत पाहिले गेले



होते. 33 वर्षांचा हर्ष त्यानंतर एक-दोन आणखी प्रसंगी मलायकाजवळ दिसला.

सोशल मीडियावर दोघांच्या नात्याबद्दल अटकळ बांधली जाऊ लागली. काही रिपोर्ट्सनी तर असेही लिहिले की अर्जुन कपूरसोबत ब्रेकअपनंतर मलायका हर्षला डेट करत आहे.

---

# अशोक शिंदे बनले मनोवैज्ञानिक

अशा तीनही माध्यमांमध्ये अभिनेता अशोक शिंदे यांनी विविधांगी भूमिका साकारून प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. आता ‘केस नं.७३’ या आगामी चित्रपटातून ते एका वेगळ्या भूमिकेतून प्रेक्षकांसमोर येणार आहेत. चित्रपटात मनोवैज्ञानिक डॉ.श्रीकांत ही व्यक्तिरेखा ते साकारणार आहेत. या चित्रपटाच्या निमित्ताने अशोक शिंदे बऱ्याच काळानंतर मराठी रुपेरी पडद्यावर दिसणार आहेत. अशोक शिंदे यांनी आजवरच्या अभिनय प्रवासात आपल्या अष्टपैलूत्वाने विविध भूमिकांमध्ये रंग भरले आहेत.

‘केस नं. ७३’ चित्रपटाचा गूढ टिझर नुकताच प्रदर्शित झाला असून भय, वास्तव आणि भ्रमाच्या विळख्यातील नेमकं ‘रहस्य’ काय असणार? डॉ.श्रीकांत हे गूढ रहस्य उलगडू शकणार का ? की तेच या रहस्याचा एक भाग आहेत, हे पाहणं उत्सुकतेचं असणार आहे. प्रसिद्ध मनोवैज्ञानिक असलेल्या डॉ.श्रीकांत ही व्यक्तिरेखा माझ्यासाठी आव्हानात्मक होतीच पण सोबत अभिनेता म्हणून आनंद देणारी होती, प्रेक्षकांनाही ही भूमिका नक्की आवडेल असं अशोक शिंदे सांगतात.

लायलॅक मोशन पिक्चर्स आणि डस्क स्टुडिओज निर्मित ‘केस नं. ७३’ हा मराठी चित्रपट नवीन वर्षात जानेवारीत प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन डॉ. मिलिंद मुक्तेश्वर आपटे यांनी केले असून चित्रपटाची निर्मिती शर्वरी सतीश वटक, डॉ. मिलिंद मुक्तेश्वर आपटे यांनी केली आहे. सहनिर्माते प्रविण अरुण खंगार आहेत. अशोक शिंदे, राजसी भावे, शैलेश दातार, नंदिता पाटकर, पियुष आपटे अशी तगडी स्टारकास्ट चित्रपटात दिसणार आहे. चित्रपटाची पटकथा डॉ. ऋचा अमित येनुरकर यांची आहे. मंदार चोळकर यांनी चित्रपटाची गीते लिहिली असून संगीत आणि पार्शवसंगीताची जबाबदारी अमेय मोहन कडू यांनी सांभाळली आहे. छायांकन निनाद गोसावी यांचे आहे.



# गोव्यातील एक बीच, एकच वेळ ... कार्तिक आर्यनसोबत कोण होती ही ‘मिस्ट्री गर्ल’?

मुंबई : गोव्याच्या समुद्रकिनाऱ्यावरून समोर आलेल्या काही फोटोंमुळे बॉलिवूड अभिनेता कार्तिक आर्यन पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. एकच बीच, तोच टॉवेल आणि जवळपास समान फ्रेममध्ये दोन वेगवेगळ्या सोशल मीडिया अकाउंट्सवरून शेअर झालेले फोटो आणि त्यामुळेच सोशल मीडियावर प्रश्नांचा पाऊस पडलाय हा केवळ योगायोग की काहीतरी वेगळंच?

सध्या कार्तिक आर्यन आपल्या आगामी सिनेमांपेक्षा गोव्यातील सुट्टीमुळे अधिक चर्चेत आहे. कार्तिकने शेअर केलेल्या व्हेकेशन फोटोंनंतर काही वेळातच एका तरुणीचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. विशेष म्हणजे हे फोटोही अगदी त्याच लोकेशनवरून असल्याचं दिसून आलं आणि तिथूनच चर्चांना उधाण आलं.

मिस्ट्री गर्ल’ कोण?

या तरुणीचं नाव करिना कुबिलियूट असल्याचं सोशल मीडियावर सांगितलं जात आहे. काही रिपोर्ट्सनुसार, जानेवारीच्या



पहिल्या आठवड्यात कार्तिक आर्यन आणि करिना हे दोघेही गोव्यातील सेंट रेजिस हॉटेलमध्ये थांबले होते. मात्र, दोघांची राहण्याची व्यवस्था वेगवेगळ्या खोल्यांमध्ये होती असे करिनाने स्पष्ट केले आहे.

काही जण तिला यूकेमध्ये शिक्षण घेणारी १८ वर्षांची विद्यार्थिनी असल्याचं सांगत आहेत, तर काही रिपोर्ट्समध्ये तिच्या वयाबाबत वेगळी माहिती दिली जात आहे. मात्र, याबाबत कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही.

दरम्यान, या सगळ्या चर्चांवर कार्तिक आर्यनकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. तर करिनाने काही काळासाठी आपल्या इंस्टाग्राम बायोमध्ये, “मी कार्तिक आर्यनला ओळखत नाही,” असं लिहिलं होतं. नंतर तिने ते वाक्य हटवलं.

योगायोग की चर्चेचा नवा अध्याय?

गोव्यात घडलेला हा प्रकार केवळ योगायोग आहे की त्यामागे काही वेगळीच गोष्ट आहे, हे अजून

---

# इंडियन आयडॉलमधून चमकलेला आवाज शांत; गायक प्रशांत तमांग यांचे वयाच्या 43व्या वर्षी निधन



मुंबई : मनोरंजन विश्वासाठी धक्कादायक बातमी समोर आली असून, ‘इंडियन आयडॉल’च्या तिसऱ्या पर्वातून देशभर लोकप्रिय ठरलेले गायक आणि अभिनेता प्रशांत तमांग यांचे रविवारी निधन झाले. दिल्लीतील निवासस्थानी असताना प्रकृती बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र उपचारांपूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. वयाच्या ४३व्या वर्षी त्यांच्या अकाली जाण्याने संगीतप्रेमींना मोठा धक्का बसला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रशांत तमांग यांना हृदयविकाराचा झटका आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, यासंदर्भात अधिकृत वैद्यकीय अहवाल अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही. नुकतेच ते अरुणाचल प्रदेशातील एका कार्यक्रमातून दिल्लीला परतले होते. त्यानंतरच ही दुर्दैवी घटना घडल्याचे सांगितले जात आहे.

चाहत्यांमध्ये शोककळा

प्रशांतच्या निधनाची बातमी पसरताच भारतासह नेपाळमध्येही शोककळा पसरली. दार्जिलिंग परिसर, गोरखा समाज आणि संगीत क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून श्रद्धांजली अर्पण केली आहे. त्यांच्या अचानक जाण्यामुळे सहकलाकार, चाहते आणि सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींना मोठा धक्का बसला आहे. विशेष म्हणजे, त्यांना याआधी कोणतीही गंभीर आरोग्य समस्या नव्हती, अशी माहितीही समोर येत आहे.

पोलीस खात्यातून संगीत विश्वापर्यंतचा प्रवास

दार्जिलिंग येथे जन्मलेले प्रशांत तमांग मूळचे नेपाळी भाषिक होते. संगीताची आवड असूनही त्यांनी सुरुवातीला कोलकाता पोलिस दलात कॉन्स्टेबल म्हणून सेवा बजावली. पोलिस दलाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांमधून त्यांचा आवाज अनेकांना परिचित झाला. याच आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी ‘इंडियन आयडॉल सीझन ३’मध्ये सहभाग घेतला आणि २००७ साली विजेतेपद पटकावले.

या यशानंतर त्यांनी नेपाळी संगीतविश्वात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. निवडक पण आशयघन गाणी, सांस्कृतिक मुळांशी नातं जपणारी गायकी आणि साधेपणामुळे त्यांचा श्रोत्यांशी खास भावनिक संबंध निर्माण झाला होता. काही अभिनय प्रकल्पांमधूनही त्यांनी प्रेक्षकांची दाद मिळवली.

---

# नॉर्थ अमेरिकेत रणवीर सिंगचा दबदबा; ‘धुरंधर’चा $20 मिलियन क्लबमध्ये ऐतिहासिक प्रवेश

रणवीर सिंगने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की भारतीय चित्रपट आता केवळ देशाच्या सीमांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. धुरंधरने नॉर्थ अमेरिकेत $20 मिलियनहून अधिक ग्रॉस कलेक्शन करत रणवीरने केवळ मोठे बॉक्स ऑफिस यश मिळवले नाही, तर भारतीय सिनेमाच्या जागतिक प्रभावात एक नवे पर्वही जोडले आहे. या ऐतिहासिक यशासह रणवीर सिंग आता प्रभाससोबत त्या मोजक्या भारतीय कलाकारांच्या यादीत सामील झाला आहे, ज्यांच्या चित्रपटांनी नॉर्थ अमेरिकेत $20 मिलियनपेक्षा अधिक कमाई केली आहे. ही कामगिरी विशेष ठरते कारण धुरंधर हा बाहुबली 2 नंतर जवळपास नऊ वर्षांमध्ये हा टप्पा गाठणारा केवळ दुसरा भारतीय चित्रपट ठरला आहे—जे त्याच्या भव्यतेसह या यशाच्या दुर्मिळतेलाही अधोरेखित करते या चित्रपटाचे यश केवळ कमाईपुरते मर्यादित राहिलेले नाही. नॉर्थ अमेरिकेत 20 लाखांहून अधिक प्रेक्षकांची उपस्थिती, सलग हाऊसफुल शो आणि पुन्हा-पुन्हा चित्रपट पाहण्याचा वाढता ट्रेंड, यावरून स्पष्ट होते की हा चित्रपट केवळ प्रवासी भारतीयांपुरता मर्यादित नसून, मेनस्ट्रीम प्रेक्षकांमध्येही त्याने भक्कम पकड निर्माण केली आहे. धुरंधरच्या यशासह रणवीर सिंगने हे ठामपणे अधोरेखित केले आहे की भारतीय सिनेमाची जागतिक झेप आता केवळ कल्पना राहिलेली नाही, तर ती एक ठोस वास्तव बनली आहे. दमदार आशय, भव्य मांडणी आणि स्टार पॉवर यांच्या जोरावर भारतीय सिनेमा आता जागतिक व्यासपीठावर एक नवी ओळख निर्माण करत असल्याचे हे यश दर्शवते.



## अर्थविश्व...

### शत्रू देशाशी व्यापार कराल तर 25 % टॅरिफ! ट्रम्प यांची घोषणा, भारताच्या 12000 कोटींच्या निर्यातीवर मोठं संकट




अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत व्यापार करणाऱ्या देशांवर 25 टक्के आयात शुल्क लावण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर तणाव वाढला. चीन, यूएई, तुर्की आणि भारत यांसारखे देश याच्या कक्षेत आले आहेत. भारताच्या 12 हजार कोटींच्या व्यापारावर याचा परिणाम होणार आहे. भारत इराणला बासमती तांदूळ निर्यात करतो आणि हा तांदूळ व्यापार वार्षिक सुमारे 12,000 कोटींचा आहे.अमेरिकेच्या या कृतीमुळे आणि इराणमध्ये सुरू असलेल्या विरोध प्रदर्शनांमुळे या क्षेत्रावर मोठा परिणाम झाला आहे," असे अहवालात म्हटले आहे. भारत हा इराणला बासमती तांदूळ पुरवणारा एक प्रमुख देश आहे. इराणमधील तांदळाच्या एकूण मागणीपैकी सुमारे दोन तृतीयांश भाग भारतातून पुरवला जातो. मात्र, अमेरिकेच्या 25 टक्के आयात शुल्काच्या घोषणेनंतर भारताकडून इराणला होणारी बासमती तांदूळ निर्यात जवळपास थांबली आहे.

भारतीय बासमती तांदूळ निर्यातदारांसाठी ट्रम्प यांची ही कृती एक मोठी समस्या बनली आहे. कारण अमेरिका आधीच भारतीय वस्तूंवर 50 टक्के उच्च आयात शुल्क लावत आहे. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, पेमेंट न मिळण्याच्या आणि संभाव्य अतिरिक्त शुल्काच्या भीतीमुळे बासमती पुरवठादार नवीन व्यवहार करण्याबाबत सावध झाले आहेत. तसेच, इराणमधील खरेदीदारांसोबत नवीन करार करण्यास ते कचरत आहेत.2018-19 मध्ये भारत-इराण व्यापार 17.03 अब्ज डॉलर होता, जो 2024-25 मध्ये घटून 1.68 अब्ज डॉलर झाला आहे. भारत इराणला बासमती तांदूळ, चहा, साखर, ताजी फळे आणि औषधे निर्यात करतो. तर, इराणकडून सफरचंद, पिस्ता, खजूर आणि किवी यांसारख्या वस्तू आयात करतो.केंद्र सरकारने म्हटले आहे की, भारताचे इराणसोबतचे व्यापारी संबंध तुलनेने मर्यादित आहेत आणि इतर देशांशी भारताचे निर्यात संबंध आहेत. त्यामुळे या निर्णयाचा भारतावर फारसा परिणाम होण्याची शक्यता नाही, सरकारने ट्रम्प यांच्या 25 टक्के आयात शुल्काचा भारतावर होणारा परिणाम मर्यादित असेल असे म्हटले आहे.

### सरकारी कंपनीच्या शेअरमध्ये 9 % तेजी, सोने-चांदीच्या दरवाढीशी थेट कनेक्शन? स्टॉकची किंमत 69 रुपये



सलग तिसऱ्या दिवशी एका शेअरमध्ये तेजी दिसून आली, ज्यात बुधवारच्या सुरुवातीच्या 9% पेक्षा जास्त वाढ झाली. बीएसईवर हा स्मॉल-कॅप स्टॉक 9.22% वाढून 69.49 प्रति शेअरवर पोहोचला आहे. हा MMTC कंपनीचा शेअर आहे.

शेअरमध्ये तेजीचे कारण काय?

सोने आणि चांदीच्या किमतीत झालेली वाढ हे या शेअरच्या किमतीत वाढ होण्याचे मुख्य कारण मानले जात आहे. एमएमटीसी ही सरकारी मालकीची ट्रेडिंग कंपनी असून ती मौल्यवान धातूंच्या व्यापारात सक्रिय आहे.

MMTC च्या शेअरमध्ये अचानक अनेक पटींनी वाढ झाली. 14 जानेवारी रोजी सुमारे 2 कोटी शेअर्सचा व्यवहार झाला, तर त्याचा एका आठवड्याचा सरासरी व्हॉल्यूम केवळ 48 लाख शेअर्स आणि एका महिन्याचा सरासरी व्हॉल्यूम सुमारे 1 कोटी शेअर्स होता. इतकी मोठी खरेदी दर्शवते की किरकोळ गुंतवणूकदारांसोबतच मोठ्या गुंतवणूकदारांचीही यात रुची वाढली आहे. सामान्यतः, जेव्हा एखाद्या शेअरमध्ये व्हॉल्यूमसह तेजी येते, तेव्हा ती अधिक मजबूत मानली जाते. 52 आठवड्यातील शेअरची सर्वात उच्चांक किंमत ही 88.19 रुपये होती. तर 44.50 रुपये ही सर्वात निचांकी किंमत होती.

एमएमटीसीचा चार्ट मजबूत तांत्रिक दृष्ट्याही दिसत आहे. लक्ष्मीश्री इन्व्हेस्टमेंट्सचे रिसर्च हेड अंशुल जैन यांच्या मते, शेअरने डेली चार्टवर बुलिश फ्लॅग पॅटर्नमधून ब्रेकआउट दिला आहे, जो अल्पकालीन अपट्रेंड सुरू राहण्याचे संकेत देतो. जर शेअर 70.47 रुपयांच्या वर टिकून राहिला, तर तेजी आणखी वाढू शकते आणि येत्या काळात 78 पर्यंत स्तर दिसू शकतात," असे अंशुल जैन यांनी सांगितले.गेल्या एका महिन्यात एमएमटीसीचा शेअर 25% पेक्षा जास्त वाढला आहे, तर 5 वर्षांमध्ये 116% चा रिटर्न दिला आहे, ज्यामुळे तो गुंतवणूकदारांसाठी अधिक आकर्षक बनला आहे.

### तब्बल पाच वर्ष काम करुनही पगार वाढ नाहीच, उलट होतेय घट, कर्मचाऱ्याची पोस्ट व्हायरल

मुंबई: देशभरात अनेक आयटी कंपन्या आहेत आणि जेव्हा टाटा ग्रुपच्या प्रमुख कंपन्यांचा विचार केला जातो तेव्हा टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस ( टीसीएस ) चा उल्लेख वारंवार केला जातो. गेल्या काही महिन्यांत टीसीएस नोकऱ्या कपातीमुळे चर्चेत आहे. आता, कंपनीचे नाव पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. यावेळी, कारण ठरत आहे ती

जावा डेव्हलपर म्हणून ओळख मिळवणाऱ्या या कर्मचाऱ्याचा दावा आहे की भारतातील आघाडीच्या आयटी कंपन्यांपैकी एक असलेल्या TCS पाच वर्षांहून अधिक काळ काम करूनही, त्याचा पगार वाढण्याऐवजी कमी झाला आहे. रेडिट फोरमवरील एका पोस्टमध्ये, हा कर्मचारी त्याच्या संपूर्ण प्रवासाचे वर्णन करतो. त्याच्या मते, 2020 मध्ये जेव्हा तो टीसीएसमध्ये सामील झाला तेव्हा त्याचा मासिक पगार 25,000 रुपये होता. परंतु 2026 मध्ये, साडेपाच वर्षांनंतर, त्याचा घरपोच पगार फक्त 22,800 रुपयांवर आला आहे. या पोस्टमध्ये, कर्मचारी त्याच्या काही प्रमुख कारकिर्दीतील चुका आणि निर्णय प्रामाणिकपणे सांगतो.

# दुसरा वनडे- भारताचे 285 धावांचे आव्हान:न्यूझीलंडच्या दोन विकेट पडल्या, डॅरिल मिशेलनंतर विल यंगची फिफ्टी



दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताने न्यूझीलंडसमोर २८५ धावांचे लक्ष्य ठेवले. राजकोटमधील निरंजन शाह स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताने ५० षटकांत ७ बाद २८४ धावा केल्या.

न्यूझीलंडने ३२ षटकांत २ गडी गमावून १६६ धावा केल्या आहेत. संघाकडून विल यंग आणि डॅरिल मिशेल मैदानावर आहेत. दोघांनीही आपले अर्धशतक पूर्ण केले आहे. त्यांच्यात शतकी भागीदारी पूर्ण झाली आहे.

डॅरिल मिशेलने सलग दुसऱ्या सामन्यात अर्धशतक झळकावले. पहिल्या एकदिवसीय सामन्यात त्याने ८४ धावा केल्या होत्या. सर्व फॉरमॅटमध्ये सलग ९ डावांनंतर विल यंगने अर्धशतक झळकावले आहे. हर्षित राणाने सहाव्या षटकात डेव्हॉन कॉनवेला आणि प्रसिद्ध कृष्णाने १३ व्या षटकात हेन्री निकोल्सला बाद केले.

भारताकडून केएल राहुलने ९२ चेंडूत नाबाद ११२ धावा काढल्या आणि त्याचे ८ वे एकदिवसीय शतक साकारले. कर्णधार शुभमन गिलने ५६, रोहित शर्माने २४ आणि विराट कोहलीने २३ धावा केल्या. रवींद्र जडेजाने २७ धावा करून महत्त्वपूर्ण योगदान दिले.

न्यूझीलंडकडून ख्रिश्चन क्लार्कने तीन विकेट घेतल्या, तर पदार्पण करणाऱ्या जेडेन लेनोक्स, जॅक फॉल्क्स, काइल जेमीसन आणि कर्णधार मायकेल ब्रेसवेल यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

केएल राहुल फलंदाजीच्या प्रत्येक स्थानावर शतक करणारा पहिला फलंदाज

न्यूझीलंडविरुद्ध ५ व्या क्रमांकावर शतक केल्यानंतर, केएल राहुलने एक महत्त्वाचा विक्रम केला. पहिल्या क्रमांकापासून सहाव्या क्रमांकापर्यंत प्रत्येक फलंदाजीच्या स्थानावर शतक करणारा तो जगातील एकमेव फलंदाज आहे.

संभाव्य प्लेइंग-11

भारत: शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल (यष्टीरक्षक), रवींद्र जडेजा, नितीश कुमार रेड्डी/आयुष बडोनी, कुलदीप यादव, हर्षित राणा, मोहम्मद सिराज, अर्शदीप सिंग.

न्यूझीलंड: मायकेल ब्रेसवेल (कर्णधार), डेव्हॉन कॉन्वे, विल यंग, हेन्री निकोल्स, डॅरिल मिचेल, ग्लेन फिलिप्स, मिच हे (यष्टीरक्षक), जॅक फॉल्क्स, काईल जेमिसन, मायकेल रे, आदित्य अशोक, क्रिस्टियन क्लार्क.

## विराट कोहलीआणि गंभीर यांच्यात संवादाचा अभाव...अखेर सत्य आलं समोर; भारतीय कोचच्या विधानाची चर्चा

मुंबई: भारत आणि न्यूझीलंड यांच्यात एकदिवसीय क्रिकेट मालिका सुरु आहे. या मालिकेतील पहिला सामना वडोदरामध्ये रंगला जिथे भारताच्या पदरी यश आले. आता दुसरा सामना राजकोटमध्ये रंगेल. हा सामना आज रंगणाअसून पुन्हा एकदा रो-को वर चाहत्यांच्या लक्ष असेल. आता या दरम्यान Virat Kohli And Rohit Sharma यांचे प्रशिक्षक Gautam Gambhir यांच्यासोबत मतभेद आहे का यावर भारतीय फलंदाजी कोच यांनी मोठे विधान केले आहे.

भारतीय फलंदाजी प्रशिक्षक सीतांशू कोटक म्हणतात की, "रोहित शर्मा आणि विराट कोहली त्यांचे अनुभव आणि कल्पना संघ व्यवस्थापनासोबत शेअर करतात आणि भविष्यातील नियोजनात सक्रियपणे सहभागी असतात. कोहली आणि भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यात संवादाचा अभाव असल्याच्या अफवांनाही त्यांनी फेटाळून लावले."राजकोटमध्ये भारत आणि न्यूझीलंडमधील दुसऱ्या एकदिवसीय सामन्याच्या एक दिवस आधी कोटक यांनी दिलेल्या विधानावरून असेही दिसून येते की, "रोहित आणि कोहली यांनी दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर चर्चा केली आहे, जिथे पुढील विश्वचषक 22 महिन्यांत खेळला जाईल. ते स्वतः या चर्चा आणि नियोजनात सहभागी आहेत. गंभीरशी एकदिवसीय स्वरूप, आमचे सामने आणि दक्षिण आफ्रिकेसाठीच्या आमच्या योजनांबद्दल बोलतात. मी बहुतेक वेळा तिथे असतो आणि जेव्हा जेव्हा मी ऐकतो तेव्हा तो नक्कीच त्यांचे अनुभव शेअर करतो. मी नेहमीच त्यांना बोलताना पाहतो." दोन्ही वरिष्ठ खेळाडूंमधील विचारांच्या समन्वयाबद्दल आणि संघ व्यवस्थापनाच्या नियोजनाबद्दलच्या प्रश्नाचे उत्तर कोटक यांनी दिले. कोहली आणि गंभीर एकमेकांशी बोलत नाहीत अशा अफवांनाही त्यांनी फेटाळून लावले. ते म्हणाले, "साहजिकच, तुम्हाला सोशल मीडियावर बऱ्याच गोष्टी दिसतात, ज्या मी पाहणे टाळण्याचा प्रयत्न करतो. मुख्य प्रशिक्षकाच्या रोहित आणि कोहलीशी असलेल्या संबंधांबद्दल मीडिया आणि सोशल मीडियावर बरीच चर्चा झाली आहे, विशेषतः कोहलीशी. रोहित आणि कोहली दोघांनीही अशा परिस्थितीत कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली ज्याची कारणे फारशी स्पष्ट नाही."



## बांगलादेश सरकारचा आता मोठा निर्णय, भारतामधील वर्ल्ड कप सामन्यांबाबत आयसीसीला काय सांगितलं पाहा...

भारताला धक्का देण्यासाठी बांगलादेशने टी २० वर्ल्ड कपचे कार्ड काढले आहे. भारतामध्ये आम्ही टी २० वर्ल्ड कपचे सामने खेळणार नाही, असे बांगलादेशच्या क्रिकेट संघटनेने म्हटले होते. पण त्यानंतर आयसीसीने बांगलादेशचे सामने भारताबाहेर खेळवू शकत नाही, असे स्पष्ट सांगितले होतं. त्यानंतर आता बांगलादेशच्या सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे.



बांगलदेशमध्ये हिंदूवर अत्याचार होत आहे. निष्पाप हिंदूंचे जीव बांगलादेशमध्ये घेतले जात आहेत. त्यामुळे बांगलादेशच्या खेळाडूंना आयपीएलमध्ये एंट्री देऊ नये, अशी भूमिका भारतीयांना घेतली होती. त्यामुळे बांगलादेशच्या मिस्ताफिझुर रेहमानला बीसीसीआयने आयपीएलच्या बाहेर काढले. त्यानंतर बांगलादेशने भारतामध्ये आमच्या खेळाडूंसाठी सुरक्षित वातावरण नाही, असे म्हणत आम्ही वर्ल्ड कपचे सामने भारतात खेळणार नाही, अशी भूमिका घेतली होती. पण वर्ल्ड कपच्या सामन्यांचे नियोजन झाल्यामुळे बांगलादेशचे सामने भारताबाहेर होऊ शकत नाहीत, असे आयसीसीने कळवले होते. आता बांगलादेशच्या सरकारने याबाबत एक मोठा निर्णय घेतला आहे.

बांगलादेश क्रिकेट बोर्ड आणि आंरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या पदाधिकाऱ्यांची पुन्हा बैठक झाली. त्यानंतर बांगलादेशने आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. दरम्यान, बांगलादेश संघास भारतात खूपच कमी धोका आहे, याकडे आयसीसीने लक्ष वेधले. भारत आणि श्रीलंकेत संयुक्तपणे होत असलेली टी-२० वर्ल्ड कप स्पर्धा ७ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. सध्याच्या कार्यक्रमानुसार बांगलादेशचे तीन सामने कोलकाता येथे, तर एक लढत मुंबईत आहे. वर्ल्ड कप स्पर्धेतील बांगलादेशच्या लढती भारतात नको, ही ठाम भूमिका बांगलादेश सरकारचे क्रीडा सल्लागार आसिफ नझरुल यांनी घेतली आहे. त्यामुळे बांगलादेशच्या सरकारनेही आता भारातमधील वर्ल्ड कपच्या सामन्यांना नकारच दिला आहे आणि ही गोष्ट त्यांनी आयसीसीला सांगितली आहे. 'बांगलादेश क्रिकेट संघाला भारतात कोणताही थेट धोका नाही, हे बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या सुरक्षा पथकास कळवण्यात आले आहे. काही ठिकाणी माफक स्वरूपाचा धोका आहे. मात्र, संघाचे सामने अन्यत्र खेळवण्याइतका हा धोका मोठा नाही,' असेही आयसीसीने बांगलादेशला स्पष्ट केले आहे.

'आम्ही कुठल्याही स्थितीत भारतात खेळण्यास तयार नाहीत. बांगलादेश संघाच्या लढती भारताऐवजी अन्यत्र खेळवण्यासही सांगण्यात आले,' असे बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या पत्रकात म्हटले आहे.

## ज्याची भीती तेच झालं! रोहित शर्माला ICCचा मोठा धक्का

मुंबई : आयसीसीने जाहीर केलेल्या रँकिंगमध्ये विराट कोहलीने आयसीसी एकदिवसीय फलंदाजी क्रमवारीत अव्वल स्थान पुन्हा मिळवले आहे. मात्र रोहित शर्मा याला मोठा धक्का बसला आहे. ताज्या क्रमवारीनुसार नंबर एकला असलेला रोहित शर्मा पिछाडीवर पडलाय. रोहितने मागील काही सामन्यांमध्ये मोठी खेळी केल्याने त्याला फटका बसला आहे. तर दुसरीकडे विराटने रोहितला मागे टाकत चार वर्षांनी ७८५ रँकिंगसह नंबर एकवर पुन्हा एकदा ताबा मिळवला आहे.

रोहित शर्मा सध्या आयसीसी फलंदाजी क्रमवारीत ७७५ रँकिंगसह तिसऱ्या स्थानावर आहे. पूर्वी तो पहिल्या क्रमांकावर होता, परंतु मागील काही सामन्यांमध्ये मोठी खेळी न केल्यामुळे तो दोन स्थानांनी खाली घसरला आहे. न्यूझीलंडचा अष्टपैलू खेळाडू डॅरिल मिचेलने कारकिर्दीतील सर्वोत्तम ७८४ रँकिंग मिळवत दुसरे स्थान पटकावले आहे. तो कोहलीच्या केवळ एका गुणाने मागे आहे. टॉप ५ मध्ये भारताचे तीन फलंदाज आहेत. रोहित आणि विराट व्यतिरिक्त शुभमन गिल देखील या यादीत आहे. वनडे कर्णधार शुभमन गिल आयसीसी फलंदाजी क्रमवारीत ७२५ रेटिंगसह पाचव्या स्थानी कायम आहे. गिलने दक्षिण आफ्रिकेविरुद्धची मागील एकदिवसीय मालिका खेळली नव्हती, परंतु न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात अर्धशतक झळकावून त्याने शानदार पुनरागमन केले. श्रेयस अय्यर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेनंतर दुखापतीमुळे तीन महिने मैदानाबाहेर होता. तरीही, तो आयसीसी एकदिवसीय फलंदाजी क्रमवारीत टॉप १० मध्ये आहे.

तो ६८२ रेटिंगसह आपल्या स्थानावर कायम आहे. अय्यरने ११ जानेवारी रोजी न्यूझीलंडविरुद्ध वडोदरा येथे झालेल्या एकदिवसीय सामन्यात पुनरागमन केले. केएल राहुलला आयसीसीच्या नवीन क्रमवारीत फायदा झाला आहे. त्याच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे तो १२ व्या स्थानावरून ११ व्या स्थानी पोहोचला आहे.

# विराट कोहलीने सचिन तेंडुलकरचा मोठा रेकॉर्ड मोडला, फक्त एक धाव करताच कोणता महाविक्रम रचला

राजकोट : विराट कोहली हा सचिन तेंडुलकर यांचे एकामागून एक विक्रम मोडत आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या सामन्यात तर फक्त एक धाव करत विराट कोहलीने सचिन तेंडुलकर यांचा एक मोठा विक्रमही मोडला आहे.

विराट कोहली हा भन्नाट फॉर्मात आहे. पहिल्या वनडे सामन्यात त्याचे शतक फक्त सात धावांनी हुकले होते, ९३ धावांवर असताना तो बाद झाला होता. त्यावेळीच विराट कोहलीने सचिन तेंडुलकर यांच्या एका मोठ्या विक्रमाशी बरोबरी केली होती. या सामन्यात विराट कोहली मैदानात उतरला. विराट कोहलीने पहिली धाव घेतली आणि थेट सचिन तेंडुलकर यांचा एक मोठा विक्रम त्याने मोडीत काढला.

रोहित शर्मा २४ धावांवर बाद झाला आणि विराट कोहली मैदानात उतरला. विराट या सामन्यात आपली शतकाची कसर भरून काढणार का, याकडे सर्वांचे डोळे लागलेले होते. विराटने संयतपणे आपल्या डावाची सुरुवात केली. विराट पुन्हा एकदा चांगल्या लयीत दिसत होता. विराट एकामागून एक धावा काढत होता आणि तो पुन्हा एकदा अर्धशतकाच्या जळ जात होता. पण यावेळी विराट कोहलीकडून एक चूक घडली. विराट कोहलीला चेंडूचा अंदाज आला नाही. चेंडू स्टम्पवर येत होता आणि कोहली या चेंडूचा अंदाज घ्यायला चुकला. त्यावेळी विराटवर क्लीन बोल्ड व्हायची वेळ आली. विराटने या सामन्यात दोन चौकारांच्या जोरावर २३ धावा केल्या. यावेळी विराटने सचिन तेंडुलकर यांचा मोठा विक्रम मोडीत काढला. आतापर्यंत न्यूझीलंडविरुद्ध सचिन हे ४२ सामने खेळले होते आणि त्यांनी १७५० धावा केल्या होत्या. विराट कोहली यावेळी न्यूझीलंडविरुद्ध ३५ वा सामना खेळण्यासाठी मैदानात आला होता. विराटने या या सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध १५७३ धावा केल्या आणि सचिन तेंडुलकर यांचा मोठा विक्रम मोडला. या सामन्यापूर्वी विराट कोहलीला एक गुड न्यूज मिळाली होती. कारण वनडे क्रमवारीत विराट कोहलीने अव्वल स्थान पटकावले होते. त्यानंतर सचिन यांचा मोठा



विक्रमही त्याने मोडीत काढला आहे.

विराट कोहलीला या सामन्यात मोठी खेळी साकारता आली नाही, पण त्याने सचिन तेंडुलकर यांचा मोठा विक्रम मोडलेला आहे.

दैनिक दिव्य वतन महापालिकेचा

गुरुवार दिनांक १५ जानेवारी २०२६





# महासंग्राम



## महत्त्वाचे...

### माझा महायुती किंवा मविआला पाठिंबा नाही...



मुंबईसह राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उद्या मतदान होत असतानाच, मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट करत कोणत्याही राजकीय आघाडीला पाठिंबा दिला नसल्याचे जाहीर केले आहे. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी महाविकास आघाडी किंवा महायुती यांपैकी कोणाचीही बाजू घेतलेली नाही, असे स्पष्ट करत त्यांनी तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, माझ्या नावाने कोणी पाठिंब्याचे पत्रक प्रसिद्ध करत असेल, तर त्यावर समाजाने विश्वास ठेवू नये, असे आवाहन करत त्यांनी मतदानाच्या तोंडावर होणाऱ्या अफवांना पूर्णविराम दिला आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले, माझा मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात होत असलेल्या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी असा कुणालाही पाठिंबा नाही. माझे जूने व्हिडिओ कोणी व्हायरल करत असतील तर ते चूकीचे आहे. माझ्या नावाने कुणी पत्रके प्रसिद्ध करत असतील तर त्यावर कुणीही विश्वास ठेवू नये. जर कुणी स्थानिक पातळीवर पिठींबा दिला असेल तर तो त्यांचा व्यक्तिगत विषय असेल त्याचा आमच्याशी कोणताही संबंध नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

### नवी मुंबईत राडा!:भाजप-शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते भिडले



महापालिका निवडणुकीच्या आदल्या दिवशीच अनेक ठिकाणी राजकीय संघर्ष पाहायला मिळत आहे. कुठे पैसे वाटल्याच्या कारणाने राडा होत आहे, तर कुठे दोन पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद होत आहेत. असेच काहीसे चित्र नवी मुंबईत बघायला मिळाले आहे. येथील घणसोली परिसरात भाजप आणि शिवसेना शिंदे गटात जोरदार हाणामारी झाली आहे. भाजपचे नेते व माजी महापौर यांच्या उपस्थितीतच ही हाणामारी झाली. मंगळवारी रात्री घणसोली येथे भाजप आणि शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली आणि या वादाचे रूपांतर थेट हाणामारीमध्ये झाले होते. या घटनेचा सीसीटीव्ही फुटेजही सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे.दरम्यान, महायुतीमधील घटक पक्षांमध्येच हा राडा होत असल्याने अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आल्याचे अनेक ठिकाणी पाहायला मिळत आहे. शिवसेना शिंदे गट आणि भाजप हे एकत्रित निवडणूक लढवत असले तरी काही ठिकाणी धुसफूस सुरूच असल्याचे दिसून येत आहे. याचा परिणाम आता निवडणुकीवर कसा होतो याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. मुंबईतील ताडदेव परिसरात महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानापूर्वी काही तास शिल्लक असताना पैशांच्या वाटपावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. राज्याचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांचे निकटवर्तीय मानले जाणारे भाजप कार्यकर्ते प्रदीप छेडा, प्रकाश मोरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून पैशांचे वाटप केले जात असल्याचा खळबळजनक आरोप शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी आणि स्थानिक महिलांनी केला आहे.

# नागपुरात आचारसंहितेचा भंग?:चंद्रशेखर बावनकुळे वादाच्या भोवऱ्यात, भाजप-काँग्रेस कार्यकर्त्यांत तणाव

दिव्य वतन /वृत्तसेवा

नागपूर महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराची मुदत संपलेली असतानाच, प्रभाग क्रमांक 10 मध्ये पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे भाजप उमेदवारासह फिरत असल्याचा आरोप काँग्रेसने केल्यामुळे बुधवारी स्थानिक राजकारण चांगलेच तापले. या आरोपावरून गिट्टीखदान पोलीस ठाण्याच्या हद्दीत काँग्रेस आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये जोरदार शाब्दिक चकमक उडाली, ज्यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलिसांनी वेळीच मध्यस्थी आणि तत्पर हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला आणि परिस्थिती नियंत्रणात आली.

निवडणुकीच्या प्रचाराची मुदत संपलेली असतानाही, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे प्रभाग क्रमांक 10 मध्ये भाजप उमेदवारासोबत फिरत असल्याचा गंभीर आरोप काँग्रेस उमेदवारांनी केला आहे. पालकमंत्री म्हणून त्यांना फिरण्याचे स्वातंत्र्य असले तरी, प्रचारबंदी लागू झाल्यानंतर एखाद्या उमेदवारासोबत प्रत्यक्ष फिरणे हे निवडणूक आचारसंहितेचे स्पष्ट उल्लंघन आहे, असा दावा काँग्रेसने केला. या मुद्द्यावरून राजकीय वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली असून पालकमंत्र्यांच्या या कृतीवर काँग्रेसने तीव्र आक्षेप नोंदवला आहे.

काँग्रेस आणि भाजप कार्यकर्ते आमनेसामने

या घटनेमुळे कुतुबशहा नगर परिसरात प्रचंड तणाव निर्माण झाला असून काँग्रेस शहराध्यक्ष विकास ठाकरे यांनीही तातडीने घटनास्थळी धाव घेतली. यावेळी काँग्रेस आणि भाजप कार्यकर्ते आमनेसामने आल्याने त्यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक झाली आणि परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, गिट्टीखदान पोलिसांनी वेळीच प्रसंगावधान राखत घटनास्थळी धाव घेतली आणि दोन्ही गटांना शांत केले, ज्यामुळे पुढील अनर्थ टळला.

चंद्रशेखर बावनकुळेंचे स्पष्टीकरण

या आरोपांवर चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्टीकरण दिले. कुतुबशहा नगरमधील राजू देवगडे हे माझे अत्यंत जवळचे कार्यकर्ते आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी मला त्यांच्या घरी बोलावले होते. त्या निमित्ताने मी काही कार्यकर्त्यांच्या घरी भेटीगाठी घेत होतो, असे बावनकुळे यांनी सांगितले. तसेच काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांमध्ये गैरसमज झाला की मी निवडणूक प्रचारासाठी आलो आहे. मात्र हा पूर्णपणे गैरसमज होता. काँग्रेसचे शहराध्यक्ष विकास ठाकरे घटनास्थळी आले होते. त्यांना सर्व वस्तुस्थिती समजावून सांगितली असून सत्य त्यांच्या लक्षात आले आहे. त्यामुळे काँग्रेसचा गैरसमज आता दूर झाला असेल, असे मला वाटते, असे बावनकुळे म्हणाले.



पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, निवडणूक आयोगाच्या नियमानुसार प्रचार न करता, कोणतेही पत्रक न वाटता कार्यकर्त्यांच्या घरी भेट देण्यास परवानगी आहे. मी नियमांचे पूर्ण पालन केले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## अमित ठाकरेंचा देवेंद्र फडणवीसांवर प्रश्नांचा भडिमार:महागाई, प्रदूषण आणि महिला सुरक्षेच्या मुद्द्यावरून मुख्यमंत्र्यांना घेरले

दिव्य वतन /वृत्तसेवा

महापालिका निवडणुकीसाठीच्या प्रचाराच्या तोफा आता थंडावल्या असून आता अवघे काही तास मतदानासाठी बाकी आहेत. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अमित ठाकरे यांनी एक व्हिडओ शेअर करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर प्रश्नांचा भडिमार करत हल्लाबोल केला आहे.

अमित ठाकरे यांनी व्हिडिओच्या माध्यमातून शेतकरी आत्महत्या, महागाई, महिला सुरक्षा, प्रदूषण आणि राजकारणात झालेला विकृतपणा यावरून हल्लाबोल



केला आहे. तसेच सोलापूरमध्ये मनसे नेत्याचा खून झाला होता. त्याच्या कुटुंबाला आपल्याला आधार द्यावासा का वाटला नाही, असा सवालही अमित ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.अमित ठाकरे म्हणाले, हा व्हिडिओ कोणत्याही प्रचारासाठी नसून एका सामान्य नागरिकाचा मुख्यमंत्र्यांना सवाल आहे. मी राजसाहेबांचा मुलगा म्हणून नाही, कोणत्या पक्षाचा नेता म्हणून नाही, तर एक सामान्य नागरिक म्हणून बोलतोय. मी तुमचं प्रचार बघतोय, मी तुमच्या मुलाखती बघतोय. पण मुख्यमंत्री म्हणून तुम्हाला जे प्रश्न विचारले गेले पाहिजेत, दुर्दैवाने ते विचारले जात नाही. तेच मी आज विचारायला आलो असल्याचे ठाकरे म्हणाले.पुढे बोलताना अमित ठाकरे म्हणाले, पहिला प्रश्न तुम्ही ज्या महागाईच्या मुद्द्यावरून निवडून आलात. 2014 ते 2026, तुम्ही मुख्यमंत्री होतात, उपमुख्यमंत्री होतात, त्यानंतर पुन्हा मुख्यमंत्री झालात आणि केंद्रातही तुमची सत्ता होती,

## 'पाडू' मशीनवर आक्षेप ही ठाकरे बंधूंची पराभवाची तयारी:चंद्रशेखर बावनकुळेंचा दावा; मतदानाच्या आदल्या दिवशीच्या भेटीगाठीचेही केले समर्थन

दिव्य वतन /वृत्तसेवा

भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ईव्हीएमला जोडण्यात येणाऱ्या पाडू मशीनवरील आरोप फेटाळून लावलेत. ठाकरे बंधूंना आपल्या पराभवाची चाहूल लागली असून, त्यातून ते अशी विधाने करत आहेत, असे ते म्हणालेत. मतदानाच्या आदल्या दिवशी मतदारांच्या भेटीगाठी घेणे हे नियमांनुसारच आहे, असेही ते यावेळी म्हणालेत.

निवडणूक आयोगाने मतदानाच्या आदल्या दिवशी मतदारांना भेटण्याची मुभा दिली आहे. मनसे अध्यक्ष



राज ठाकरे यांनी यावर जोरदार आक्षेप घेतला आहे. पत्रकारांनी याविषयी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना छेडले असता ते म्हणाले, केंद्र किंवा राज्य निवडणूक आयोगाच्या नियमानुसार कोणतेही पेपर किंवा जाहिरात न करता कोणत्याही हँडबिल किंवा पोस्टर न वाटता आपल्याला मतदारांच्या घरी जाता येते. आम्हालाही चार घरी भेटी देता येतात. पण याचा अर्थ असा नाही की, आम्ही कार्यकर्त्यांकडे जायचे नाही, कुणाला भेटायचे नाही. समाजातील प्रतिष्ठित लोकांना भेटावेच लागते. शेवटी मतदान कुणाला करायचे ते लोक करतील. पण भेट घेणे हे नियमातच आहे.

पाडू मशीनवरील आरोप फेटाळले

राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगाने पाडू मशीनच्या मुद्यावर राजकीय पक्षांना विश्वासात घेतले नसल्याचाही आरोप केला आहे.

बावनकुळे यावर म्हणाले, काँग्रेस, उद्धव ठाकरे यांना आपला पराभव होणार आहे असे वाटते तेव्हा ते अशी विधाने करतात. ही पराभवापूर्वीची तयारी आहे. ज्या ठिकाणी काँग्रेसचा विजय होतो, त्या ठिकाणी ते मशीनला दोष देत नाहीत. ज्या ठिकाणी काँग्रेस किंवा महाविकास आघाडीचा पराभव होतो

## 25 वर्षे भ्रष्टाचार का दडवला? तुम्हीही त्यात सामील आहात का ? अजित पवारांच्या गौप्यस्फोटावर एकनाथ खडसेंचा बोचरा सवाल

दिव्य वतन /वृत्तसेवा

महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत २५ वर्षांपूर्वीच्या सिंचन प्रकल्पावरून नवा राजकीय वाद पेटला आहे. १९९९ मधील भाजप आणि शिवसेना युती सरकारच्या काळात 'पार्टी फंडा'साठी प्रकल्पांची किंमत वाढवण्यात आल्याचा खळबळजनक आरोप उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला आहे. मात्र, अजित पवारांच्या या दाव्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी जोरदार पलटवार केला असून, "एवढी वर्षे तुम्ही भ्रष्टाचाराची माहिती दडवून ठेवली, म्हणजे तुम्हीही त्यात सामील आहात का?" असा बोचरा सवाल त्यांनी उपस्थित करत, तुमच्याकडची फाईल आता सार्वजनिक कराच, असे आव्हान अजित पवारांना दिले.

महापालिका निवडणुकीच्या प्रचारात अजित पवारांनी सिंचन घोटाळ्याच्या आरोपांवरून भाजपवर निशाणा साधला. ते म्हणाले, "१९९९ मध्ये जेव्हा मी जलसंपदा मंत्री झालो, तेव्हा पुणे जिल्ह्यातील 'पुरंदर उपसा सिंचन योजने'ची फाईल माझ्याकडे आली. या प्रकल्पाची मूळ किंमत २०० कोटी असताना ती ३१० कोटी दाखवण्यात आली होती. चौकशी केली असता अधिकाऱ्यांनी कबूल केले की, तत्कालीन सरकारने १०० कोटी रुपये पार्टी फंडासाठी मागितले होते आणि त्यात अधिकाऱ्यांनी स्वतःचे १० कोटी वाढवून किंमत ३१० कोटी केली होती. ती फाईल आजही माझ्याकडे आहे."

एकनाथ खडसेंचा जोरदार हल्लाबोल

अजित पवारांच्या या आरोपांनंतर त्या काळात जलसंपदा मंत्री राहिलेल्या एकनाथ खडसे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. खडसे म्हणाले, अजित दादांना २५ वर्षांनंतर याची आठवण झाली का? जर तुम्हाला भ्रष्टाचाराची माहिती होती, तर २५ वर्षे ती का दडवली? याचा अर्थ तुम्ही भ्रष्टाचाराला संरक्षण दिले आहे.

१०० कोटी वाढवण्यासाठी मूळ किंमत मोठी असायला हवी. पार्टी फंडासाठी एस्टिमेट वाढवणे किंवा अबव्ह टेंडर देणे असे प्रकार माझ्या काळात झाले नाहीत. अजितदादांनी केवळ मोघम बोलू नये. ती फाईल कोणती, तो प्रकल्प कोणता हे जनतेसमोर उघड करावे. ती फाईल सार्वजनिक करावी आणि सत्यता तपासून घ्यावी, असे आव्हान एकनाथ खडसे यांनी अजित पवारांना दिले.

भ्रष्टाचार दडपण्याचा प्रयत्न



खडसे यांनी पुढे असाही आरोप केला की, सिंचन घोटाळ्याच्या आरोपावरून स्वतःवरचे लक्ष विचलित करण्यासाठी अजित पवार जुन्या प्रकरणांचा आधार घेत आहेत. "दादांनी जर कारवाई केली नाही, तर त्याचा अर्थ त्यांनी तो भ्रष्टाचार दडपण्याचा प्रयत्न केला आहे. आता केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून असे आरोप करणे चुकीचे आहे," असेही खडसे यांनी नमूद केले.

## संभाजीनगरमध्ये भाजपवर पैसे वाटपाचे आरोप

दिव्य वतन /वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानाला अवघे काही तास शिल्लक असताना छत्रपती संभाजीनगरमध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. शहरात विविध ठिकाणी भाजप कार्यकर्त्यांकडून पैसे वाटप होत असल्याचा खळबळजनक आरोप शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्यांनी केला आहे. यावरून शिवसैनिक आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये झटापट झाल्याच्या घटना समोर आल्या असून, "पैसे वाटणाऱ्यांना चोप द्या, असा आदेश उद्धवजींनी दिल्याचे ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी सांगितले.

मिळालेल्या माहितीनुसार,



मंगळवारी रात्री शहरातील नरेश भालेराव आणि अनिकेत राठोड यांच्या प्रभागात संशयास्पद हालचाली सुरू असल्याची माहिती शिवसैनिकांना मिळाली. एका ठिकाणी एका व्यक्तीला मतदारांना पैसे वाटताना शिवसैनिकांनी रंगेहाथ पकडले. विशेष म्हणजे, जप्त करण्यात आलेल्या पाकिटांवर कोणत्या मतदाराला किती पैसे द्यायचे, याची नावेही लिहिलेली असल्याचा दावा करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला.

# राज ठाकरेंनी एकनाथ शिंदेंवर टीका करणे का टाळले ?

## उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले कारण; उद्धव ठाकरेंवर साधला निशाणा

दिव्य वतन /वृत्तसेवा

महापालिका निवडणुकीला आता अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार प्रचार केला. अनेक सभा पार पडल्या. प्रमुख नेत्यांनी विविध माध्यमांना मुलाखतीही दिल्या. यात त्यांनी अनेक विषयनावर भाष्य केले. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील एका वृत्तपत्राला मुलाखत दिली, यात त्यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे. तसेच राज ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करणे टाळले होते, यावरही शिंदेंनी खुलासा केला आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले, काही लोकांनी एकनाथ शिंदेंना ओळखले नाही. मी सत्ता आणि खुर्चीसाठी लालची नाही. मी तेव्हाही म्हणत होतो, लोकांनी जे बहुमत दिले त्याचा सन्मान करू. कोणी फसवले, कोणी काय केले हे सोडा, आपण युती करूया. पण त्यांचा 5 वर्ष सत्तेत राहण्याचा विचार पक्का होता. पण दुसरीकडे शिवसैनिकांचे खच्चीकरण होत होते. शेवटी आपण एक समान विचारधारा, हिंदुत्वाची विचारधारा आणि बाळासाहेबांचे विचार घेऊन पुढे आलोय. त्याशिवाय मी कुठला गुन्हा केला नाही. एखादा जमीन घोटाळा, भ्रष्टाचार असे मी कधी केले नाही. त्यामुळे काही लोक जे खोटे आरोप करतात, खोटं बोल पण रेटून बोल असे करतात. ते राज ठाकरेंनी टाळले असेल असे शिंदेंनी म्हटले.

मी अडीच वर्षात मुख्यमंत्री म्हणून खूप काम केले

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, खुर्ची आणि सत्ता याची लालसा मला कधीच नव्हती. मी अडीच वर्षात मुख्यमंत्री म्हणून खूप काम केले. या महाराष्ट्राची सेवा करता आली. लाडकी बहीणसारखी योजना मला आणता आली. अनेक योजना, रखडलेले प्रकल्प आम्ही पुढे नेले. लाडक्या बहीण योजनेमुळे लाडका भाऊ म्हणून मला ओळख मिळाली आणि ही ओळख सर्व पदांपेक्षा मोठी आहे हे मानणारा मी कार्यकर्ता आहे.

राज ठाकरेंच्या कामगिरीवर बोलणे टाळले

तसेच राज ठाकरे यांचा निवडणुकीत मोठा पराभव होणार असल्याचे विधान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. यावर प्रतिक्रिया देताना एकनाथ शिंदे म्हणाले, निवडणुकीनंतर काय होईल त्यावर आत्ताच बोलणे हे आततायीपणाचे होईल. शेवटी जनता जनार्दन ठरवत असते. कोणी कितीही काही बोलले, अंदाज लावला तरी जनतेच्या मनात काय हे मतपेटीत दिसते. त्यामुळे 16 तारखेला कळेल, असे म्हणत शिंदेंनी राज ठाकरेंच्या कामगिरीवर बोलणे टाळले आहे.

आमच्याकडे मतांची टक्केवारी उद्धव ठाकरेंपेक्षा जास्त

शेवटी कुणी कुणासोबत येऊ शकते. कार्यकर्ता हा पक्ष वाढवत असतो. त्याच्या मागे उभे राहण्याचे काम आपण करायला हवे. त्यात सातत्य हवे. महापालिका, जिल्हा परिषद झाल्यानंतर संघटनेकडे लक्ष द्यावे लागेल. 3 वर्षात आम्ही एवढे यश मिळवले ही



सोपी गोष्ट नाही. संघटना मजबूत करणे, पक्ष वाढवणे हे सगळे पुढे करायचे आहे. लोकशाहीत बहुमताला महत्त्व आहे. लोकसभा असो विधानसभा आमच्याकडे मतांची टक्केवारी उद्धव ठाकरेंपेक्षा जास्त असल्याचे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

तसेच पुढे एकनाथ शिंदे म्हणाले, नगरपरिषदेतही तेच झाले आणि आता महापालिकेतही तेच होईल. संसदीय आणि संघटनात्मक इथेही आमची ताकद जास्त आहे. त्यामुळे नियमाप्रमाणे निवडणूक आयोगाने शिवसेना आणि धनुष्यबाण आम्हाला दिले आहे. कोर्टात प्रकरण असल्यामुळे त्यावर अधिक भाष्य करू शकत नाही. पण बहुमताला महत्त्व असते.

५ ६